❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाची कामे पूर्ण करा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाची बैठक



■ मुंबई (दै. संध्या)

वनसंवर्धन राखीव क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून त्यांच्या जीवनात आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी कॅम्पा अंतर्गत असलेल्या निधीचा मोठा हातभार लागू शकतो. या निधीच्या उपयोगातून व्याघ्र प्रकल्प आणि इतर संरक्षित क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाची कामे पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

तसेच या निधीतून पूर्ण केलेल्या वनीकरण, मृद व जलसंधारणाच्या कामांची उपग्रह व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पडताळणी करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी आज दिल्या.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाची (महा कॅम्पा) बैठक झाली. यावेळी आढावा घेताना मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीला दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे वनमंत्री गणेश नाईक उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, कॅम्पाअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची सध्याची पडताळणीची पद्धत बदलून कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यात यावी. पूर्ण झालेल्या वनीकरणाच्या कामांपैकी काही नमुने निवडून त्यांचे सर्वेक्षण करावे. संबंधित यंत्रणांनी मृद व जलसंधारण तसेच वनीकरण कामांकडे गांभीर्याने लक्ष देऊन ही कामे पूर्ण करावीत.

राष्ट्रीय कॅम्पा निधीतून राज्यातील राखीव वनक्षेत्रातील गावांचे टप्प्याटप्प्याने पुनर्वसन करण्यासाठी केंद्राकडे निधीची मागणी करावी. त्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा. राज्यस्तरीय कॅम्पा प्राधिकरणाला मनुष्यबळ उपलब्धतेसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा घेण्यात यावी. राज्याच्या राखीव निधीसाठी रिझर्व बँकेमध्ये खाते उघडण्याची कार्यवाही पूर्ण करावी. या निधीवरील अधिकच्या व्याजासाठी चांगले गुंतवणूक पर्याय निवडून प्रयत्न करावे. राज्याच्या महत्वाकांक्षी ३०० कोटी वृक्ष लागवड मोहिमेसाठी या निधीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वनीकरण करावे आणि वनेतर जमीन वनांखाली आणावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सध्या असलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये या निधीचा उपयोग करीत कुरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा. यामधून चाऱ्याची उपलब्धता आणखी सुनिश्चित करता येईल. बैठकीस वन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, अपर मुख्य सचिव (वित्त) विकासचंद्र रस्तोगी, पर्यावरण सचिव जयश्री भोज, कृषी सचिव परिमल सिंग, ग्रामविकास सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी आणि कॅम्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी याटबोन उपस्थित होते.

कॅम्पा अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा थोडक्यात आढावा

पर्यायी वनीकरण अंतर्गत आतापर्यंत १ लाख ७ हजार ८६५ हेक्टरवर रोपवनाची कामे पूर्ण करण्यात आली. तसेच २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीत ५६२ निवासस्थाने आणि ८३ कार्यालयांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. त्याचप्रमाणे महिलांकरिता ६२ विश्रामगृहे तयार करण्यात आली. कुरण विकास कार्यक्रमांतर्गत १५, ७२४ हेक्टर क्षेत्रावर कुरण विकासाची कामे पूर्ण करण्यात आली . या निधीच्या उपयोगातून व्याघ्र प्रकल्प, इतर संरक्षित क्षेत्रांमधील ५५ गावांचे पुनर्वसन करण्यात आले.

थोडक्यात...

जरांगे प्रकरणी मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

मुंबई : दैनिक संध्या

मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या क्लिपमधील संभाषणावरून सत्ताधारी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणातील सत्य काय, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या काही कथित ऑडिओ क्लिपची चर्चा सुरू आहे. या क्लिपमध्ये 500 कोटी रुपयांचा उल्लेख असल्याचा दावा केला जात आहे. तसेच संभाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाचाही उल्लेख असल्याचे सांगितले जात आहे. या ऑडिओ क्लिपवरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. काही नेत्यांनी या संभाषणातील आवाज भाजपच्या नेत्यांचा असल्याचा दावा केला आहे. मात्र, भाजपने या क्लिपशी आपला संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथक म्हणजेच SIT स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या तपासादरम्यान कथित ऑडिओ क्लिपची सत्यता पडताळली जाणार आहे. क्लिपमधील आवाज नेमका कोणाचा आहे, संभाषण खरे आहे की त्यात काही बदल करण्यात आले आहेत आणि त्यामागील संपूर्ण घटना काय आहे, याचा शोध घेतला जाऊ शकतो.

टोरंट पॉवर प्रकल्पासाठी वृक्षतोडीचा मुद्दा ऐरणीवर

नेरळ : दैनिक संध्या

कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट पॉवरच्या प्रस्तावित उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी सुरू असलेल्या वृक्षतोडीवरून वातावरण तापले असताना आता या प्रश्नावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भूमिका समोर येणार आहे. प्रकल्पग्रस्त आणि कर्जत संघर्ष समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे यांनी २५ ऑक्टोबर रोजी मुंबईतील शिवतीर्थ येथे राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर २८ ऑक्टोबर रोजी राज ठाकरे प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष पाहणी दौरा करणार असून, त्यानंतर कर्जतमध्ये सभा घेणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या भेटीवेळी मनसेचे नेते संदीप देशपांडे, अविनाश जाधव, जितेंद्र पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष अभिजित घरत, शैलेश सुर्वे, कर्जत तालुका अध्यक्ष यशवंत भवारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सायडोंगर परिसरातील प्रस्तावित प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून आणि पर्यावरणप्रेमींकडून केला जात आहे.



दुष्काळाचा कहर! करपलेले धानपीक रोटावेटर फिरवून नष्ट करण्याची शेतकऱ्यांवर वेळ

■ चंद्रपूर (दै. संध्या)

जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, पावसाअभावी शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले धानपीक करपून गेले आहे. सिंचनाच्या सुविधांचा अभाव आणि परतीच्या पावसाने दिलेली हुलकावणी यामुळे शेतकऱ्यांवर उभ्या पिकावर रोटावेटर फिरवून ते नष्ट करण्याची वेळ आली आहे. तुकूम गावातील माणिक धर्माजी दोहितरे आणि अशोक मुकरू बनकर या दोन शेतकऱ्यांनी अनुक्रमे तीन एकर आणि अडीच एकरांतील करपलेले धानपीक रोटावेटर फिरवून नष्ट केले. शेतीसाठी हजारो रुपये खर्च करूनही पदरी काहीच न पडल्याने आता कर्जाची परतफेड कशी करायची आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. नागभीड शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कूम येथील शेतकरी माणिक धर्माजी दोहितरे यांच्याकडे तीन एकर शेती आहे. यंदा त्यांनी आपल्या शेतात चिन्नोर जातीच्या धानाची लागवड केली होती. शेतीच्या मशागतीपासून लागवड आणि इतर कामांसाठी त्यांना सुमारे ७० ते ७५ हजार रुपये खर्च आला. मात्र, त्यांची संपूर्ण शेती कोरडवाहू असल्याने पावसावरच पिकाची मदार होती. शेतात सिंचनासाठी एक छोटीशी बोडी असली, तरी यंदा अत्यल्प पावसामुळे तीही आधीच आटली. त्यामुळे पिकाला दुसरे पाणी देण्याची कोणतीही सोय उरली नाही. परिणामी, तीन एकरांतील संपूर्ण धानपीक करपून गेले.

IPL 2027 च्या 'मिनी लिलावा'ची तारीख जाहीर!

गोव्यात रंगणार बोली, खेळाडूंवर होणार कोट्यवधींची बरसात

■ मुंबई (दै. संध्या)

इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) आगामी २०२७ च्या मोसमासाठी खेळाडूंच्या 'मिनी लिलावा'चे बिगुल अखेर वाजले आहे. यंदाचा हा रोमांचक लिलाव येत्या १६ डिसेंबर रोजी गोव्यात पार पडणार आहे. विशेष योगायोग म्हणजे याच दिवशी बंगळुरू येथे भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामनाही खेळवला जाणार असल्याने क्रिकेट रसिकांसाठी १६ डिसेंबरचा दिवस दुहेरी मनोरंजनाचा ठरेल. या लिलाव प्रक्रियेपूर्वी सर्व १० फ्रँचायझींना येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत आपापल्या संघात कायम ठेवण्यात येणाऱ्या (रिटेन) आणि संघातून मुक्त (रिलीज) करण्यात येणाऱ्या खेळाडूंची अधिकृत यादी जाहीर करावी लागणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष लिलाव सुरू होण्याच्या बरोबर एक आठवडा आधी सर्व संघांना उपलब्ध खेळाडूंची अंतिम यादी तसेच त्यांच्या बोलीचा क्रम यासंदर्भातील सविस्तर तपशील सुपूर्द केला जाईल. आयपीएल २०२६ चा मोसम संपल्यानंतरच्या काळात खेळाडूंच्या देवाणघेवाणीत फारशी मोठी हालचाल पाहायला मिळालेली नाही. आतापर्यंत केवळ दोन खेळाडूंची अधिकृत 'ट्रेड' पूर्ण झाली आहे. नियमांनुसार, मोसम संपल्यानंतरच्या एका महिन्यापासून ही 'ट्रेड विंडो' सुरू होते आणि लिलावाच्या एक आठवडा आधीपर्यंत खुली राहते. त्यानंतर ही खिडकी पुन्हा एकदा उघडली जाऊन नवा मोसम सुरू होण्याच्या बरोबर एक महिन्यापूर्वी बंद होते.

या वर्षी जून महिन्यात लखनौ सुपर जायंट्सने एक मोठा निर्णय घेत आपला कर्णधार ऋषभ पंत याला दिल्ली कॅपिटल्सकडे सोपवले, तर त्या मोबदल्यात अनुभवी रिस्ट-स्पिनर कुलदीप यादवला आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले. याशिवाय अलिकडेच दिल्ली कॅपिटल्सने वेगवान गोलंदाज टी. नटराजनला सनरायझर्स हैदराबादकडे पाठवले असून, त्या बदल्यात अद्याप आंतरराष्ट्रीय पदार्पण न केलेल्या (अनकॅप्ड) गुणवंत युवा लेगस्पिनर जीशान अन्सारीला आपल्या संघात संधी दिली आहे.

गेल्या सलग तीन वर्षांपासून आयपीएल लिलावाचे सोहळे परदेशात आयोजित केले जात होते. यामध्ये २०२४ चा लिलाव दुबईत, २०२५ चा सौदी अरेबियातील जेद्दा येथे आणि २०२६ चा लिलाव अबुधाबी येथे पार पडला होता. या लिलाव प्रक्रियेसाठी सर्व फ्रँचायझींचे मालक, उच्चपदस्थ अधिकारी, मुख्य प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि निवड समिती प्रतिनिधींचा भलामोठा ताफा उपस्थित राहत असतो.

एवढ्या मोठ्या मनुष्यबळासाठी परदेशात जाऊन मुक्काम करणे, पंचतारांकित हॉटेलचे आरक्षण, अंतर्गत वाहतूक व्यवस्था आणि इतर व्यवस्थापन हाताळणे फ्रँचायझींसाठी प्रचंड खर्चिक आणि आव्हानात्मक ठरत होते. विशेषतः 'मिनी लिलावा'त मोजक्याच खेळाडूंवर बोली लागत असल्याने परदेशातील खर्च अनावश्यक मानला जात होता. याच पार्श्वभूमीवर यंदाचा मिनी लिलाव गोव्यात घेण्याचा व्यावहारिक निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, क्रिकेट विश्वाचे लक्ष लागून राहिलेला पुढील 'मेगा लिलाव' हा आयपीएल २०२८ च्या मोसमापूर्वी आयोजित केला जाणार आहे.



वेळापत्रकाबाबत अद्याप साशंकता

आयपीएल २०२७ च्या अधिकृत तारखांची अद्याप भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) औपचारिक घोषणा करण्यात आलेली नाही. दरम्यान, २०२४ मध्ये पुढील तीन वर्षांचे संभाव्य वेळापत्रक निश्चित करताना १४ मार्च ते ३० मे हा कालावधी ठरवण्यात आला होता. मात्र, नुकत्याच सप्टेंबर महिन्यात पार पडलेल्या बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर (एजीएम) बोर्डाचे सचिव देवाजीत सैकिया यांनी दिलेल्या संकेतांनुसार, आगामी मोसमाची सुरुवात मार्च महिन्याच्या अखेरीस होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

१००% इथेनॉलवर चालणाऱ्या 'E100' इंधनाला मंजुरी

केंद्राचा मोठा निर्णय : सामान्य व पारंपरिक वाहनांमध्ये E85 किंवा E100 चा वापर निषिद्ध

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

देशातील हरित इंधन क्रांतीला गती देण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सोमवारी (दि. २६) केंद्रीय मोटार वाहन नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा अधिसूचित केली आहे. या निर्णयामुळे १०० टक्के इथेनॉलवर आधारित 'E100' इंधनावर धावणाऱ्या फ्लेक्स-इंधन (फ्लेक्स-फ्यूल) वाहनांचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. ही वाहने प्रामुख्याने ८५ टक्के इथेनॉल मिश्रित 'E85' आणि १०० टक्के इथेनॉलयुक्त 'E100' या दोन्ही प्रकारच्या पर्यायी इंधनांवर विनाअडथळा चालण्यास सक्षम असणार आहेत. मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, २० टक्क्यांपेक्षा अधिक इथेनॉलचे मिश्रण असलेल्या इंधनाचा वापर केवळ त्या विशिष्ट क्षमतेसाठी डिझाइन आणि प्रमाणित केलेल्या वाहनांमध्येच करता येणे शक्य होणार आहे. याचा थेट अर्थ असा की, सध्या रस्त्यांवर धावणाऱ्या नियमित पेट्रोल अथवा २० टक्के मिश्रण असलेल्या 'E20' इंधनावर चालणाऱ्या सामान्य वाहनांमध्ये E85 किंवा E100 या उच्च इथेनॉल मिश्रित इंधनाचा वापर करता येणार नाही. चुकीच्या इंधनाच्या वापरामुळे पारंपरिक इंजिनांचे नुकसान होऊ नये, यासाठी हा स्पष्ट निकष ठेवण्यात आला आहे. नव्या नियमावलीनुसार वाहन वर्गीकरणाच्या काही मर्यादा, इंधन मानके आणि उत्सर्जन चाचण्यांशी संबंधित तांत्रिक संदर्भांमध्येही आवश्यक फेरबदल करण्यात आले आहेत. या बदलांचा भाग म्हणून संबंधित हलक्या पेट्रोल आणि डिझेल वाहनांच्या कमाल वजन मर्यादेत ३००० किलोग्रॅमवरून थेट ३५०० किलोग्रॅमपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

परदेशातून होणाऱ्या महागड्या कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांना बळ देणे हा या धोरणामागचा प्रमुख हेतू आहे. देशात यापूर्वीच २० टक्के इथेनॉल आणि ८० टक्के पेट्रोलचे प्रमाण असलेल्या 'E20' इंधनाची सुरुवात यशस्वीरीत्या झालेली आहे. वाहन निर्मिती क्षेत्रातही याचे सकारात्मक परिणाम दिसत असून, मारुती सुझुकी इंडियाने यंदा जून महिन्यात देशातील पहिली फ्लेक्स-इंधन पॅसेंजर कार 'वॅगनआर' बाजारात दाखल केली होती, जी E20 पासून अगदी E100 पर्यंतच्या कोणत्याही इंधनावर धावू शकते.



फ्लेक्स-फ्यूलकडे वाटचाल

मारुतीपाठोपाठ टोयोटा, टाटा मोटर्स आणि ह्युंदाईसह अन्य प्रमुख वाहन उत्पादक कंपन्याही भारतीय बाजारासाठी फ्लेक्स-इंधन वाहनांची निर्मिती वेगाने करत आहेत. उच्च इथेनॉल मिश्रण आणि इतर पर्यायी इंधनांचा प्रत्यक्ष वापर सुकर व्हावा, यासाठी मंत्रालयाने याआधीच वाहन उत्सर्जन नियमांमध्ये सुधारणा प्रस्तावित केल्या होत्या.

ॲमेझॉन डेटा सेंटर प्रकल्पाला स्थगिती द्या

आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र

■ ठाणे (दै. संध्या)

बाळकूम-माजिवडा परिसरातील प्रस्तावित ॲमेझॉन डेटा सेंटर प्रकल्पामुळे ठाणे शहराच्या पाणीपुरवठा आणि वीज वितरण व्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडण्याची शक्यता असून, पर्यावरणावरही विपरीत परिणाम होऊ शकतात. त्यामुळे या प्रकल्पाच्या संभाव्य परिणामांचा सर्वंकष अभ्यास पूर्ण होऊन तज्ज्ञ समितीचा अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकल्पाला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तसेच, या प्रकल्पाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीत स्थानिक पातळीवर लोकचळवळीत कार्यरत असलेल्या संस्थांच्या प्रतिनिधींनाही स्थान देण्याची मागणी त्यांनी केली आहे. ठाणे शहराच्या भवितव्याशी आणि स्थानिक नागरिकांच्या जीवनमानाशी संबंधित असलेल्या या प्रकल्पाबाबत शासनाने पारदर्शक भूमिका घ्यावी, असे ठाकरे यांनी पत्रात नमूद केले आहे. डेटा सेंटरमुळे पाणी आणि विजेची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचा शहराच्या विद्यमान पायाभूत सुविधांवर किती परिणाम होईल, याचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रस्तावित डेटा सेंटरसाठी आवश्यक असणारा पाणीपुरवठा, विजेची उपलब्धता आणि वितरण व्यवस्थेवरील संभाव्य ताण याबाबत शासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी ठाकरे यांनी केली आहे.

■ बाळकूम-माजिवडा प्रकल्पामुळे पाणीपुरवठा, वीज वितरण आणि पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता

■ तज्ज्ञ समितीचा अहवाल येईपर्यंत काम थांबवण्याची मागणी



संपादकीय

मुंबईच्या सुरक्षेशी खेळू नका

भारतात काय, पण जगातही मुंबई म्हटली की "कधीही न झोपणारे शहर" अशी त्याची जगभर सर्वांना ओळख आहे, मात्र त्याचवेळी हे शहर दहशतवाद्याच्या देश विघातक शक्तीच्या, आणि समाजकंटकाच्या नेहमीच हिट लिस्ट वर राहिलेले आहे, नुकताच मुंबईच्या महापौर कार्यालयासह, हॉलीवुड चे महानायक अभिताभ बच्चन यांचे जुहू येथील जलसा निवासस्थान, प्रसिद्ध गायक दलजीत त्यांचे निवासस्थान, महालक्ष्मी रेस कोर्स येथील आगामी संगीत मैफल, आणि शहरातील काही प्रमुख शैक्षणिक संस्थांना बॉम्बस्फोटाची धमकी देणारा एक अत्यंत गंभीर ई-मेल समोर आलेला आहे,या धमकीमुळे सुरक्षा यंत्रणा, आणि मुंबई पोलिसांनी तात्काळ चक्र फिरवत संपूर्ण शहरात सुरक्षितेची मोठी वाढ केली आहे. विशेष म्हणजे या मेलमध्ये खलिस्तानचा उल्लेख करत आगामी ३१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेबर दरम्यान महत्त्वाच्या ठिकाणी हल्ले करण्याचे, व एका शाळेवर ग्रेनेड हल्ला करण्याची धमकी देण्यात आलेली आहे, महापौराच्या कार्यालयाची व इतर परिसराची कसून तपासणी केल्यानंतर जरी सध्या तरी कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नसली तरी या प्रकारामुळे संपूर्ण शहरात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून मुंबईच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे, मुंबई,आणि दहशतवाद, याचा इतिहास अतिशय वेदनादायी आणि काळाकुट्ट आहे. भूतकाळात मुंबईत १९९२-९३ मध्ये भीषण दंगे झाले, उपनगरीय रेल्वे गाड्यांना आणि सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणांना दहशतवाद्यांनी लक्ष केले,१९९३ चे साखळी बॉम्बस्फोट असोत किंवा मुंबईला हादरून टाकणारा २६/११ चा अत्यंत भीषण दहशतवादी हल्ला असो, ज्यामध्ये पाकिस्तातून आलेले दहा दहशतवादी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, ताजमहाल पॅलेस, आणि ट्रायडेंट हॉटेल सारख्या प्रमुख ठिकाणी प्रत्यक्ष बसून अंदाधुंद गोळीबार करत शेकडो निरपराध नागरिकांचे बळी घेतले होते, हे मुंबईकर कधी विसरू शकत नाही, या महाविनाशकारी संकटानंतर मुंबईने अनेक प्रत्येक वेळी अफाट साहसाने स्वतःला सावरले, आणि सुदैवाने मागील काही वर्षात शहरात कोणतीही मोठी घातपाताची घटना घडली नाही, मात्र या शांततेचा अर्थ असा नव्हे, की मुंबई पूर्णपणे धोक्यापासून मुक्त झाली आहे, सध्याच्या काळात दहशतवादाच्या पारंपरिक धोक्यासोबत संघटित गुन्हेगारीचे मोठे आणि नव्याने आव्हान मुंबई समोर उभे टाकले आहे, गेले काही दिवसात कुख्यात लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून झालेली गोळीबार प्रकरणे, प्रसिद्ध व्यक्तींच्या घरावर झालेली हल्लेखोरी, आणि या गँगस्टर टोळीची दिवसेंदिवस वाढती दहशत, यामुळे मुंबईकरांच्या मनात पुन्हा एकदा भीतीचे सावट पसरले, एकीकडे देश विघातक शक्ती डिजिटल माध्यमातून धमकीचे सत्र चालवून दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत, तर दुसरीकडे गँगस्टर संस्कृती खुलेआम डोके वर काढत आहे. आगामी कालावधीत उत्तर प्रदेश बरोबर पंजाब मध्ये निवडणुका असून तेथील निवडणुकीत खलिस्तानवादी चळवळीचा मुद्दा जोर पकडण्याची चिन्ह दिसत आहे, कुठल्याही दहशतवादी टोळ्याकडून देशाच्या आर्थिक राजधानीला लक्ष केले जात आहे असे सकृत दर्शनी दिसत आहे.अशा अत्यंत गंभीर स्थितीत केवळ धमकीचे ईमेल आल्यावरच यंत्रणा आणि तात्पुरती सुरक्षा वाढवणे पुरेसे नाही, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे ती कायमच हाय अलर्ट वर राहणे अपेक्षित आहे. गुप्तचर यंत्रणांनी अधिक तत्पर होऊन अशा प्रकारच्या धमक्यांचा सायबर सेलच्या मदतीने उगम शोधून मूळ सूत्रधारापर्यंत कठोरपणे पोहोचणे, ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. केवळ व्हीआयपीच्या सुरक्षा पुरते मर्यादित न राहाता सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेलाही सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे प्रत्येक मुंबईकरांनी आजूबाजूला डोळसपणे पाहिले पाहिजे, व सतर्क राहिले पाहिजे.

जेजुरी एमआयडीसीमधील बर्जर पेंट कंपनी समोर उभे असणाऱ्या

केमिकल टँकरमुळे मोठ्या दुर्घटनेची शक्यता

कंपनीवर कारवाईची मागणी : डॉ रामदास कुटे, अध्यक्ष जेजुरी उद्योजक संघटना



■ जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी एमआयडीसी मधील बर्जर पेंट कंपनी समोर सतत उभे असणाऱ्या ज्वलनशील केमिकल टँकर मुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असून जेजुरी उद्योजक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत कंपनी व्यवस्थापनाकडे लक्ष वेधले असता कंपनी व्यवस्थापनाकडून अरेरावी करण्यात आली. सदर कंपनी व्यवस्थापनावर शासनाने कारवाई करण्याची मागणी जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे यांनी केली आहे. याबाबत डॉ. रामदास कुटे यांनी सांगितले की, जेजुरी एमआयडीसी आवारात सुमारे दोनशे लहान मोठे कारखाने असून बर्जर पेंट कंपनीत रंग निर्मिती केली जाते. यासाठी लाखो लिटर केमिकल वापरले जाते. हे केमिकल अत्यंत ज्वलनशील असून दररोज 30 ते 35 केमिकलचे टँकर कंपनी समोरच्या असणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा उभे केले जातात. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला इतर काही कारखाने आहेत. या रस्त्याच्या बाजूला उभे केलेल्या टँकर जवळच अनेक टँकर चालक गॅस, स्टोव्ह ,चुली पेटवून स्वयंपाक करतात त्यामुळे ही बाब गंभीर असून यातून मोठी दुर्घटना घडू शकते. मोठी दुर्घटना घडल्यास त्याला सामोरे जाण्याची यंत्रणा येथे उपलब्ध नाही त्यामुळे मोठी हानी होऊ शकते.

जेजुरी उद्योजक संघाने याबाबत प्रशासन,पोलिसांना याबाबत निवेदन दिले आहेत. तसेच बर्जर कंपनीला अनेक वेळा पत्रे देऊन ही त्याकडे कंपनीने दुर्लक्ष केले आहे. सोमवार दिनांक 26 रोजी जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे, पदाधिकारी रवींद्र जोशी, पांडुरंग सोनवणे यांनी बर्जर कंपनीत जाऊन कंपनी समोर उभे असलेल्या केमिकल टँकर बाबत सूचना केल्या असता, कंपनी व्यवस्थापनाने अरेरावीची भाषा केल्याचे डॉ. रामदास कुटे यांनी सांगितले. यावेळी जेजुरी पोलिसांना बोलावून कंपनीच्या समोर असणाऱ्या रस्त्यावरील केमिकलचे टँकर बाजूला हटविण्यात आले. तसेच भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी बर्जर कंपनी व्यवस्थापनावर शासनाने कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

उद्योग क्षेत्रात उतरुन ग्राहकांचा विश्वास जपणे गरजेचे

विजयराव कोलते



■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

मराठी माणसाने केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योग-व्यवसाय क्षेत्रातही आत्मविश्वासाने उतरले पाहिजे. उद्योग उभारताना ग्राहकांचा विश्वास जपणे, दर्जेदार वस्तू उपलब्ध करुन देणे आणि प्रामाणिक व्यवहार करणे ही काळाची गरज आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पुणे जिल्हाध्यक्ष विजयराव कोलते यांनी व्यक्त केले. श्रीदत्तप्रसाद फर्निचर तसेच श्री गिरीधर फर्निचर अँड इलेक्ट्रॉनिक्स या नवीन दालनाच्या भव्य उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार अशोक पवार यांनी उद्योग समूहाला शुभेच्छा दिल्या. कोरेगावमुळ येथील बबन आबा कोलते यांनी एकत्रित कुटुंबव्यवस्था जपली तसेच आदर्श शेती आणि त्याचबरोबर मुलांना उद्योग-व्यवसायात संधी देण्याची दूरदृष्टी ठेवली आहे. तो वारजा नव्या पिढीने व्यवसाय क्षेत्रात उतरुन स्वतःची ओळख निर्माण करावी आणि कुटुंबाच्या प्रगतीसोबतच समाजाच्या आर्थिक विकासातही योगदान द्यावे, असे त्यांनी नमूद केले. नवीन दालनाच्या माध्यमातून ग्राहकांना फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील विविध उत्पादने उपलब्ध होणार असून, ग्राहकांचा विश्वास संपादन करत गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या दृष्टीने या उद्योग समूहाचे नवे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात आहे. स्थानिक पातळीवर उद्योग-व्यवसायाला चालना मिळाल्यास रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यासही मदत होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे सचिव महंत कृष्णराज शास्त्री पंजाबी, महंत संदिप बाबा अंकुळनेरकर, महंत गोपालव्यास कपाटे, कीर्तनकार प्रवचनकार महंत गिरीश शास्त्री, प.पु.अनिल बाबा, प.पु. सुबोधमुनी धाराशिवकर, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप, डॉ. मणीभाई देसाई पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र कांचन, व्हाईस चेअरमन रामदास चौधरी, संचालक संजय टिळेकर, ह.भ.प. रघुनाथ चौधरी, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष कांचन, सुशांत दरेकर, अजित दरेकर, मानसिंग शितोळे, भाऊसाहेब कांचन, अर्जुन कांचन, सोपान शितोळे आणि जयसिंग भोसले, हरिभाऊ तात्या कांचन, बाळकृष्ण भोसले, सचिन कड, शामराव सावंत, नितीन कड, भास्कर कड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर गावातील पंचक्रोशीतील आजी माजी पदाधिकारी व कोलते परिवाराचे स्नेही, नातेवाईक, आप्तेष्ट, फर्निचर उद्योग व्यवसाय मधील सहकारी उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत बबन कोलते, ताराचंद कोलते, विठ्ठल कोलते, राजाराम कोलते, बापू कोलते, सदाशिव कोलते, शिवाजी कोलते, उत्तम कोलते, गणेश कोलते, निलेश कोलते, युवराज कोलते, अनिकेत कोलते, बाबासो कोलते यांनी केले. नवीन दालनाच्या उद्घाटनामुळे परिसरातील ग्राहकांना खरेदीसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध झाला असून, या उद्योग समूहाच्या पुढील वाटचालीस मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल भोसले यांनी केले.

बेल्हेश्वर विद्यालयाच्या रंगकामासाठी १९८८ च्या माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार

■ नारायणगाव (दै. संध्या)

रयत शिक्षण संस्थेच्या श्री बेल्हेश्वर विद्यामंदिर बेल्हे या विद्यालयामध्ये माजी विद्यार्थ्यांच्या वतीने एक आदर्श आणि कौतुकास्पद उपक्रम राबवण्यात आला आहे. विद्यालयाच्या रंगकामासाठी सध्या सुरू असलेल्या माजी विद्यार्थी निधी संकलन मोहिमेला प्रतिसाद देत, दहावीच्या १९८८ च्या बॅचतर्फे सर्वाधिक म्हणजेच एकूण चार वर्गांच्या रंगकामासाठी लागणारा संपूर्ण निधी विद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आला आहे. ज्या चार वर्गांमध्ये या बॅचच्या विद्यार्थ्यांनी आपले दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते, तेच चार वर्ग या निधीतून पुन्हा एकदा सुसज्ज आणि रंगरंगोटीने नटवले जाणार आहेत. आपण ज्या वर्गात शिकलो, त्या वर्गांची शोभा आणि दर्जा वाढावा, हाच यामागील या माजी विद्यार्थ्यांचा मुख्य उद्देश आणि इच्छा आहे. या पवित्र आणि कौतुकास्पद कार्यासाठी बेल्हेश्वर विद्यामंदिर बेल्हे विद्यालयातील या १९८८ च्या बॅचच्या आणि यापूर्वीच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बी. एल. पिंगट यांच्याशी झालेल्या संवादानंतर, विद्यालयासाठी लागणाऱ्या विविध उपाययोजना आणि गरजांसाठी यथाशक्ती निधी देण्याची तयारी विद्यार्थ्यांनी दर्शवली. या प्रसंगी माजी शिक्षकांचे योगदानही मोलाचे ठरले. या बॅचला हिंदी विषय शिकवणारे शिक्षक एम. ए. माने यांनी विद्यालयाच्या एका वर्गाच्या संपूर्ण रंगकामाची आर्थिक जबाबदारी स्वतः स्वीकारत आपले योगदान दिले आहे. एवढेच नव्हे तर, येत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १० वीच्या परीक्षेत हिंदी विषयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी विशेष शिष्यवृत्ती देण्याची घोषणाही शिक्षक एम. ए. माने यांनी यावेळी केली. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बी. एल. पिंगट यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, इतर बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनीही एकत्र येत अशाच प्रकारे आपापल्या परीने मदत करावी.

सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून विद्यालयाच्या सौंदर्यात आणि गौरवशाली परंपरेत भर पडेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी विद्यालयाचे माजी शिक्षक, बेल्हेश्वर विद्यामंदिर बेल्हे या विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बी. एल. पिंगट, विद्यालयाचे प्राचार्य आर. पी. पडवळ, शालेय शिक्षण समितीचे सदस्य गणेश चोरे आणि सुमित बोरचटे उपस्थित होते. तसेच, या बॅचचे माजी विद्यार्थी व सर्वांचे लाडके सामाजिक कार्यकर्ते जालिंदर औटी, ग्रामपंचायत बेल्हेचे माजी सदस्य किसन गुंजाळ, व्यावसायिक रामदास डोंगरे, प्रगतशील शेतकरी बाळासाहेब गुंजाळ, उद्योजक तानाजी कणसे यांच्यासह इतर अनेक मान्यवर व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मातृभूमी आणि शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या बॅचचे सर्वत्र कौतुक होत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



सुरक्षित बालपण अभियानांतर्गत कायदेविषयक शिबिर उत्साहात संपन्न

नारायणगाव : दैनिक संध्या

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेच्या कॉमन मिनिमम प्रोग्रॅमनुसार तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्यावतीने कायदेविषयक शिबीराचे व विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या अंतर्गत सुरक्षीत बचपन अभियान आयोजन करण्यात आले होते. (दि.२६) रोजी जिल्हा न्यायाधीश-१ तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती जुन्नर एस.बी.शेलार यांचा मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामगाव ता जुन्नर येथे सुरक्षित बालपण अभियान जुन्नर येथे संपन्न झाले. सदर शिबीरात प्रमुख वक्ते जुन्नर वकील बार असोसिएशचे उपाध्यक्ष ॲड.निलीमा शेरकर, ॲड.करमेश गाडेकर यांची उपस्थित होते. यावेळी जुन्नर तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे, जि.प. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अंकुश घोलप, मुख्याध्यापक तानाजी तळपे, दिलीप लोकरे, अजिंक्य घोलप, अंकूश कोकणे, राहुल रावते तसेच शाळेचे विद्यार्थी- विद्यार्थींनी व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सुरक्षित बालपण अभियानामध्ये बालकांचे अधिकार, बालसुरक्षा, पोस्को कायदा, वैयक्तिक सुरक्षितता, ऑनलाईन सुरक्षितता, तक्रार, रिपोर्टिंग यंत्रणा तसेच मोफत कायदेविषयक सहाय्य या विषयावर मार्गदर्शन व जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाची प्रस्तावना तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप लोहकरे व आभार प्रदर्शन तानाजी तळपे यांनी केले सदर सुरक्षित बालपण अभियान मोठ्या उत्साहात यशस्वीरित्या पार पडले.

वाल्हे नगरीत वाल्मिकी जयंती उत्साहात



वाल्हे : दैनिक संध्या

पुरंदर तालुक्यातील वाल्हे नगरीत ग्रामस्थांसह कोळी राष्ट्र संघाच्या वतीने महर्षी वाल्मिकी ऋषींची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळच्या प्रहरी महर्षी वाल्मिकींच्या संजीवन समाधीवर ह. भ. प. बबन महाराज भुजबळ यांसह कोळी समाज बांधवांच्या वतीने महाभिषेक घालण्यात आला त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात महर्षी वाल्मीकी ऋषींच्या प्रतिमेची गावातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या दरम्यान राम नामाचा जयघोष आणि हलगी वादनाने उत्सवाला अधिकच रंगत आली. मिरवणुकीनंतर लोणी काळभोर येथील ह. भ. प. चैतन्य महाराज शिंदे यांनी महर्षी वाल्मीकी ऋषी यांच्या जीवन चरित्रावर प्रवचन केले. त्यानंतर विविध धार्मिक कार्यक्रमांसह महर्षी वाल्मिकी ऋषींच्या समाधीवर पुष्पवृष्टी करून ग्रामस्थांसह कोळी समाज संघाच्या वतीने ऋषींचा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



■ मंचर (दै. संध्या)

धामणीला खंडोबाची दवणा फूल पूजा

धामणी (तालुका आंबेगाव) येथील श्री. कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात सोमवारी (दिनांक २६ ऑक्टोबर) खंडेरायाची पारंपारिक दवणा, फुल, फळ, पूजा संपन्न झाली. आश्विन महिन्यातील आकाश, दीपदान, कुलधर्म, लक्ष्मी व इंद्रपूजन, अन्वाधान, कार्तिक स्नानारंभ, निमित्ताने पहाटे स्वयंभू सप्तशिवलिंगाचा व खंडोबा, म्हाळसाई,बाणाईच्या, सर्वांग सुंदर लोभस मुखवट्याचा दुग्धाभिषेक, व पंचामृताने रुद्राभिषेक करण्यात आला. पारंपारिक दवणा, फुल, फळ महापूजा पारंपरिक वाद्याच्या गजरात १७ चिरंजीव यजमानाच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मंदिराच्या गाभाऱ्यात फुलांची आकर्षक सजावट केली होती, सोमवारी पहाटे सुवासिक फुलाने सजवलेले स्वयंभू सप्तशिवलिंग, आणि पंचधातूच्या मुखवट्यांना सुवासिक भंडाऱ्यांचा लेप लावलेला होता, खंडोबा, म्हाळसाई, व बाणाईच्या वस्त्रालंकाराने सजवलेल्या व नटवलेल्या लोभस मूर्ती, पारंपारिक वाद्याचा गजर, मोगऱ्याच्या, व दवण्याच्या अत्तराच्या सुगंधाने मंदिर परिसर दरवळून गेला, मंदिर परिसरात "सदानंदाचा येळकोट" असा जयघोष करणारे भाविक,आणि आबालवृध्द, व त्यामध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग, हे सगळे भक्तीमय वातावरण खंडोबा देवस्थान मंदिरात यावेळी दिसून आले, मंदिराच्या गाभाऱ्यात व सभा मंडपात मोगऱ्याचे, व झेंडू, अस्टरच्या फुलांच्या माळा घातलेल्या होत्या, तसेच मंदिराच्या मंडपात व शिखरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती, धनेश बढेकर, हर्षद बढेकर, साहिल बढेकर, प्रतीक राजेंद्र जाधव, अक्षय दीपक जाधव, रोहित संदीप जाधव, विक्रम महादेव जाधव, यश गाढवे, सिद्धार्थ तांबे, अक्षय अविनाश बढेकर, प्रथमेश अशोक जाधव, आदित्य गणेश भगत, किरण रोकडे,सुजल ज्ञानेश्वर विधाटे, अनिकेत चौधरी, सिद्धेश घोलप, हर्षद दत्तात्रय गाढवे, या १७ चिरंजीव यजमानाच्या हस्ते सप्तशिवलिंगाला दुग्धाभिषेक, व त्यानंतर पंचामृताने रुद्राभिषेक करण्यात आला,अभिषेकानंतर देवस्थानाचे सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, राजेश भगत, राहुल भगत, यांनी स्वयंभू सप्त शिवलिंगावर सुगंधी वनस्पती, दवणा,फुल, व फळ, पारंपरिक पद्धतीने अर्पण केले. त्यानंतर आरती करण्यात आली. आरती झाल्यानंतर देवाचे दर्शनासाठी भाविकांना मंदिर खुले करण्यात आले, रुद्राभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले,खंडोबाचे दर्शनासाठी तळेगाव ढमढेरे,महाळुंगे पडवळ, लोणी, खडकवाडी, जारकरवाडी, गावडेवाडी, गुंजाळवाडी. बेल्हे, येथील भाविक आलेले दिसत होते.

माहिती अधिकाराच्या अर्जांना केराची टोपली? ओतूरमध्ये चर्चेला उधाण!

पारदर्शक कारभाराची मागणी ओतूर ग्रामपंचायत मध्ये ठरतोय गुन्हा

■ ओतूर (दै. संध्या)

ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता यावी आणि शासकीय निधीच्या विनियोगाचा हिशोब जनतेसमोर यावा, यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू करण्यात आला आहे. मात्र, ओतूर ग्रामपंचायतीकडे माहिती अधिकारांतर्गत अर्ज दाखल करूनही ३० दिवसांहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतर काही अर्जदारांना मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार समोर येत आहे. त्यामुळे संबंधित अर्जांवर नेमकी कोणती कार्यवाही झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रामपंचायतीच्या विविध कामकाजाबाबत, विकासकामांवरील खर्च, शासकीय निधीचा विनियोग आणि प्रशासकीय कागदपत्रांची माहिती मिळविण्यासाठी नागरिकांनी माहिती अधिकाराचा आधार घेतला आहे. मात्र, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसेल, तर या विलंबामागील कारण काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

एक-दोन नव्हे, तर अनेक अर्जदारांच्या अर्जांबाबत विलंब होत असल्याच्या तक्रारी असतील, तर संबंधित प्रकरणांची तपासणी होणे आवश्यक आहे. नागरिकांनी कायदेशीर मार्गाने माहिती मागितल्यानंतर त्यांच्या अर्जांवर वेळेत कार्यवाही होणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) नुसार, सामान्यतः अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती देणे अपेक्षित आहे. निर्धारित मुदतीत माहिती न मिळाल्यास अर्जदाराला कायद्यानुसार प्रथम अपील दाखल करता येते. त्यानंतरही दिलासा न मिळाल्यास नियमानुसार द्वितीय अपील किंवा लागू परिस्थितीत माहिती आयोगाकडे तक्रार करण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

संबंधित अर्जांवर कार्यवाही का झाली नाही? माहिती देण्यास विलंब झाला असल्यास त्याची कारणे काय? अर्जदारांना त्यांच्या अर्जांची सद्यस्थिती कळविण्यात आली आहे का? या प्रश्नांवर ग्रामपंचायत प्रशासनाने स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. ओतूर ग्रामपंचायतीतील प्रलंबित माहिती अधिकार अर्जांची पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. संबंधित अर्जांची सद्यस्थिती तपासून कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी. तसेच, मुदतीचे उल्लंघन किंवा अन्य अनियमितता आढळल्यास नियमानुसार जबाबदारी निश्चित करण्याबाबत कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आता प्रशासनाच्या उत्तराची प्रतीक्षा!

नागरिकांना माहिती मिळविण्यासाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागणार का? माहिती अधिकारांतर्गत दाखल झालेल्या अर्जांवर वेळेत निर्णय होणार का? ओतूर ग्रामपंचायतीच्या संबंधित ग्रामसेवकांनी या तक्रारींबाबत आपली बाजू स्पष्ट करावी, तसेच वरिष्ठ प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



कचरा जाळल्याने भूमिगत वीजवाहिन्या जळाल्या; वीजपुरवठा खंडित

पुणे : दैनिक संध्या

वाल्हेकरवाडी येथे महादेव मंदिराजवळील उड्डाणपुलाच्या परिसरात अज्ञात व्यक्तीने कचरा जाळण्यात आल्यामुळे आज (दि. २६ ऑक्टोबर) दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास TACO-1 आणि TACO-2 या उच्चदाब भूमिगत विद्युत वाहिन्यांच्या चालू व पर्यायी अशा दोन्ही २२ केव्ही इनकमर केबल जळाल्या. यामुळे २२/११ केव्ही बेंचमार्क उपकेंद्र आणि २२/११ केव्ही पेठकर उपकेंद्रांतून निघणाऱ्या ११ केव्ही उच्चदाब वीजवाहिन्यांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. या घटनेमुळे पुणे-मुंबई महामार्गाच्या पश्चिमेकडील ताथवडे आणि पुनावळे परिसरातील सुमारे १५ ते १६ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. चालू वीजवाहिनीसोबतच पर्यायी वाहिनीची केबलही जळाल्यामुळे अन्य पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरळीत करण्यावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे बाधित वीजवाहिन्यांच्या केबल जोडण्यासह वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांकडून युद्धपातळीवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. ताथवडे आणि पुनावळे परिसरातील वीजग्राहकांनी वीजपुरवठा पूर्ववत होईपर्यंत संयम राखून महावितरणला सहकार्य करावे. केबल दुरुस्तीचे काम पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. उच्चदाब भूमिगत वीजवाहिन्या, वीज केबल्स तसेच वीजयंत्रणेजवळ कचरा जाळल्यामुळे केबल्सचे नुकसान होऊन मोठ्या परिसरातील वीजपुरवठा खंडित होऊ शकतो. अशा घटनांमुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो, तसेच महावितरणच्या वीजयंत्रणेचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी वीजवाहिन्या, भूमिगत केबल मार्ग आणि विद्युत यंत्रणेजवळ कचरा जाळू नये. कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावून महावितरणच्या वीजयंत्रणेची सुरक्षितता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.



महावितरणच्या अभियंत्यांनी जपली सामाजिक बांधिलकी!

■ राज्यातील ६ लाख १९ हजार विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेचे धडे अन् हरित ऊर्जेचा जागर

पुणे : दैनिक संध्या

एरवी राज्याला प्रकाशमय ठेवण्यासाठी रात्रंदिवस राबणाऱ्या महावितरणच्या अभियंत्यांनी यंदा संवेदनशीलतेने सामाजिक बांधिलकी जपत भावी पिढीच्या विद्युत सुरक्षेचा नवा अध्याय लिहिला. विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा आणि वीज बचतीबाबत जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने गेल्या पंधरवड्यात या अभियंत्यांनी राज्यातील तब्बल २ हजार ९१४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष जाऊन सुमारे ६ लाख १९ हजार विद्यार्थ्यांचे सादरीकरण व थेट संवादाद्वारे प्रबोधन केले. या विशेष उपक्रमादरम्यान शैक्षणिक संकुलांमध्ये विद्युत सुरक्षेचे पोस्टर्स, फ्लेक्स आणि माहितीपत्रकांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्युत यंत्रणेविषयी योग्य माहिती नसल्याने राज्यात लहान मुले आणि विद्यार्थ्यांचे विद्युत अपघात होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. यावर उपाय म्हणून महावितरणकडून यंदा अभियंता दिन व गणेशोत्सवाचे औचित्य साधून विद्युत सुरक्षा व हरित ऊर्जा प्रबोधन अभियान राबविण्यात आले. यामध्ये विद्युत सुरक्षेचे चित्रमय सादरीकरण, माहितीपत्रके आणि विविध प्रात्यक्षिके यासह विजेची निर्मिती व तिचा प्रवास कसा होतो यासह ऊर्जा बचत आणि 'विकसित भारत २०४७' या ध्येयासाठी भावी पिढीला हरित ऊर्जेचे महत्त्व समजून सांगण्यात आले. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार आणि कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत यांच्या पुढाकाराने या अभियानाचे आयोजन करण्यात आले. दि. १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीत राज्यभरातील २ हजार ९१४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ६ लाख १९ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत महावितरणच्या अभियंत्यांनी अत्यंत सोप्या भाषेत, रंजक प्रसंगांतून आणि चित्रांच्या माध्यमातून 'विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व ऊर्जा बचत' या विषयांवर प्रबोधन केले. या सादरीकरणानंतर बहुतांश शाळांमध्ये विजेचा प्रवास, विद्युत सुरक्षा आणि हरित ऊर्जेबाबत प्रश्नोत्तरांचे तास रंगले. तसेच अनेक शाळांमध्ये विद्युत सुरक्षेच्या विषयांवर चित्रांमध्ये रंग भरण्याची स्पर्धा घेण्यात आली.

दुर्गा माता मंदिर–शिवतेज नगर रस्त्यावरील पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर



पुणे : दैनिक संध्या

काळे बोराटे नगर येथील सर्व्हे क्रमांक ३०२, साई विहार परिसरातील दुर्गा माता मंदिर ते शिवतेज नगर रस्त्यावर दोन्ही बाजूंना चारचाकी वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या मार्गावरून दररोज सुमारे १५ हजार नागरिक प्रवास करतात, असा दावा करण्यात आला आहे. रस्त्याच्या कडेला वाहनांच्या पार्किंगमुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. हडपसर नागरी कृती समितीचे सूरज कुदळे यांनी रस्त्यालगत पर्यावरण संवर्धनासाठी लावलेली झाडे पार्किंगसाठी तोडण्यात आल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. याबाबत काळे पडळ वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पवार यांच्याशी संपर्क साधला असता, नागरिकांनी केलेल्या तक्रारींची प्रत्यक्ष पाहणी करून त्या सोडविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच, नागरिकांनी वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने रस्त्यावर वाहने उभी करू नयेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित वाहनचालकांवर कारवाई करण्यात येईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले. संबंधित रस्त्यावर आवश्यक ठिकाणी 'नो पार्किंग' फलक लावावेत, अशी मागणी वाहतूक विभागाकडे करण्यात आली आहे. तसेच, वृक्षतोडीच्या आरोपाची चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी उद्यान विभागाकडे करण्यात आली आहे. स्थानिक नागरिक अजिंक्य कुदळे सविता हिंगणे म्हणतात की रात्रीच्या वेळी रस्त्यावर पार्किंग केल्यामुळे वाहतुकीसाठी रस्ता शिल्लक राहत नाही.

‘एआय’मुळे वेगाने प्रगती होणार; प्रत्येकाने तंत्रज्ञान शिकण्याची गरज

डॉ. गिरीश देसाई यांचे प्रतिपादन; विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये 'डीपएंट्रा अकॅडमी'च्या एआय प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

“कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे केवळ तंत्रज्ञानातील परिवर्तन नसून शिक्षण, उद्योग, व्यवसाय आणि दैनंदिन जीवनातील प्रगतीला गती देणारे प्रभावी साधन ठरत आहे. आगामी काळात प्रत्येक क्षेत्रात एआयचा वापर वाढणार असून, बदलत्या युगात टिकून राहण्यासाठी प्रत्येकाने हे तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे,” असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड विद्यापीठाचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी केले. विद्यार्थी साहाय्यक समिती येथे डीपएंट्रा एआय अकॅडमी आणि स्टुडंट वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ उद्योजक पद्मश्री प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त तुकाराम गायकवाड, प्रीती राव, संचालक गौतम सातपुते, 'डीपएंट्रा'च्या दीपाली कुलकर्णी, सल्लागार महेश बक्षी आदी मान्यवर उपस्थित होते.



डॉ. गिरीश देसाई म्हणाले, “एआयचा प्रभावी वापर करणाऱ्या संस्था आणि उद्योगांना भविष्यात प्रगतीच्या अधिक संधी उपलब्ध होतील. शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया, अध्यापन, अध्ययन, प्रशासकीय कामकाज ते रोजगारनिर्मिती अशा विविध क्षेत्रांत एआयमुळे मोठे बदल घडत आहेत. मात्र तंत्रज्ञानाचा केवळ वापर करण्यापेक्षा त्याचा सकारात्मक, जबाबदार आणि सर्जनशील पद्धतीने उपयोग करणे अधिक महत्त्वाचे आहे. एआयच्या माध्यमातून भविष्यातील नव्या संधी निर्माण करण्याची क्षमता प्रत्येकामध्ये आहे.” प्रतापराव पवार म्हणाले, “विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता उत्कृष्टतेचा ध्यास घेतला पाहिजे. बदलत्या काळातील नवे तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतःला सातत्याने अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. योग्य संधी, मार्गदर्शन आणि पोषक वातावरण मिळाल्यास सामान्य कुटुंबातील विद्यार्थीदेखील असामान्य कामगिरी करू शकतात. विद्यार्थी साहाय्यक समितीतून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण असावा, हा आमचा प्रयत्न आहे.”

महेश बक्षी म्हणाले, “पारंपरिक शिक्षण आणि उद्योगक्षेत्राच्या प्रत्यक्ष गरजा यांमध्ये आजही मोठी दरी आहे. विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष प्रकल्प, आधुनिक तंत्रज्ञान आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांवर आधारित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होताच उद्योगक्षेत्रात प्रभावीपणे काम करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम महत्वाचा आहे. ग्रामीण भागातील युवकांपर्यंत एआय पोहोचले, तर देशाच्या सर्वांगीण प्रगतीला मोठी चालना मिळेल.”

दीपाली कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात डीपएंट्रा एआय अकॅडमीच्या ‘एआय फॉर ऑल - कृत्रिम बुद्धिमत्ता सर्वांसाठी’ या संकल्पनेची माहिती दिली. कृत्रिम बुद्धिमत्ता शिकण्यासाठी विशिष्ट वय, शैक्षणिक शाखा किंवा तांत्रिक पार्श्वभूमी असण्याची आवश्यकता नाही. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, शिक्षक, गृहिणी, नोकरदार व्यावसायिक, उद्योजक, कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी, कृषीक्षेत्रात, आणि ज्येष्ठ नागरिक कोणीही हे शिकू शकते.

गौतम सातपुते यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. “विद्यार्थ्यांना केवळ निवास आणि भोजनाची सुविधा उपलब्ध करून देणे एवढ्यापुरते समितीचे कार्य मर्यादित नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक, व्यावसायिक आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवण्यासाठी समिती सातत्याने प्रयत्नशील आहे,” असे त्यांनी सांगितले. पर्सिस्टंट सिस्टम्सचे हेल्थकेअर अँड लाईफ सायन्सेस विभागाचे प्रमुख संतोष दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले. तुषार रंजनकर व तुकाराम गायकवाड यांनी आभार मानले.

तेराव्या गोवा लघुपट महोत्सवात कुस ठरला सर्वोत्कृष्ट मराठी लघुपट

■ पुणे (दै. संध्या)

ऊसतोड कामगारांचे विदारक जीवन वास्तविकपणे पडद्यावर दाखविणाऱ्या जीवराज चोले आणि उचित मीडिया सर्विसेस निर्मित आणि ज्ञानेश्वर जाधवर दिग्दर्शित कुस या लघुपटाला ला सर्वोत्कृष्ट मराठी लघुपट म्हणून गौरविण्यात आले यात लघुपटाला मराठी विभागामध्ये ज्ञानेश्वर जाधवर यांना सर्वोत्कृष्ट पटकथा लेखनाचे पारितोषिक मिळाले

अक्षय व्यवहारे दिग्दर्शित मिटर डाऊन हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला, तर तिसऱ्या या लघुपटासाठी श्रेयस लाड यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले . पंकी या लघुपटासाठी राहुल राठोड यांना सर्वोत्कृष्ट पटकथा लेखक म्हणून गौरविण्यात आले.



मराठी चित्रपट परिवार संस्थेतर्फे पुण्यातील सारसबागेजवळील बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्र कलादालन सभागृहामध्ये महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ संगीत समीक्षक सुभाषचंद्र जाधव, ज्येष्ठ लेखक मनोहर सप्रे, विनायक कुलकर्णी, ज्येष्ठ छायाचित्रकार आनंद चैनी यांच्या हस्ते महोत्सवाचे पारितोषिक वितरण करण्यात आले. महोत्सवाचे संचालक योगेश बारस्कर यावेळी उपस्थित होते. द ट्रॅप या लघुपटासाठी रामकुमार शेडगे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पारितोषिक मिळाले. आंतरराष्ट्रीय विभागामध्ये जेम्स उगस दिग्दर्शित द नमो फुगे लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला तर डिस्टन्स वॉटर्स या लघुपटासाठी स्टील ब्युटी यांना सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक म्हणून गौरवण्यात आले आणि द लास्ट डेट या लघुपटासाठी रासकी निवरा यांना सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय पटकथा लेखक म्हणून पारितोषिक मिळाले. भारतीय विभागामध्ये माय बिलवड मुक्कू हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला तर भारत पाटील यांना अनुबौंड साऊंड या लघुपाठासाठी सर्वोत्कृष्ट भारतीय दिग्दर्शक म्हणून गौरविण्यात आले.

सतेज पाटील यांचा अभिनंदन कार्यक्रम संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

बलाढ्य सत्तेच्या झुंडीला पुरून उरणारे, गोकुळ दूध संघ संचालक मंडळ निवडणुकीत दणदणीत विजय खेचून आणणारे महाराष्ट्र राज्याचे माजी गृह राज्यमंत्री तथा पुणे शहर जिल्हा काँग्रेस प्रभारी आ.श्री. सतेज (बंटी) पाटील साहेब यांचे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे स्वागत करून भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी, पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप व पुणे मनपाचे गटनेते चंदूशेठ कदम यांनी आ. सतेज पाटील साहेब यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

सहकार क्षेत्राचे आणि कोल्हापूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शक्तिपीठ असलेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) पंचवार्षिक निवडणुकीत दूध उत्पादक सभासदांनी पुन्हा एकदा आमदार सतेज (बंटी) पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या निवडणुकीत आ. सतेज पाटील यांच्या 'राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने' २५ पैकी १३ जागा जिंकून गोकुळवर आपले निर्विवाद बहुमत सिद्ध केले आहे. सत्काराला उत्तर देताना आ. सतेज पाटील म्हणाले की, "हा विजय आमचा नसून गोकुळच्या लाखो स्वाभिमानी दूध उत्पादक सभासद शेतकऱ्यांचा आणि ठरावधारकांचा आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता त्यांनी समविचारी आघाडीला बहुमताने विजयी करून जो विश्वास आमच्यावर टाकला आहे, तो आम्ही नक्कीच सार्थ ठरवू. गोकुळ ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कामधेनू असून, सर्व विजयी २५ संचालकांना सोबत घेऊन या संस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शक आणि प्रगतीपथावर नेण्याचा आमचा मानस आहे" यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शाहिरीच्या प्रवासात साथ देणाऱ्या साठ कलासाधकांचा सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

वादक, झीलकरी, निवेदक अशा माध्यमातून शाहिरी क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्व असलेल्या आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांना ४४ वर्षांच्या कलाप्रवासात साथ देणाऱ्या साठ कलासाधकांचा सन्मान करण्यात आला. आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती वर्षानिमित्त या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी व शाहीर मावळे शिष्य परिवारातर्फे कसबा पेठेतील श्री नामदेव शिंपी कार्यालयात कलासाधकांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी पी पी ग्रुप मधील सदस्यांच्या हस्ते हे सन्मान करण्यात आले. कार्यक्रमाला ॲड. प्रताप परदेशी, शिरीष मोहिते, पराग ठाकूर, उदय जगताप, कुमार रेणुसे, पियुष शहा, प्रा. संगीता मावळे आदी उपस्थित होते. ॲड. प्रताप परदेशी म्हणाले, शाहीर मावळे यांनी तत्वाशी कधीही तडजोड केली नाही. प्रबोधिनीतर्फे त्यांनी अनेक उपक्रम सातत्याने राबविले. यामाध्यमातून नवीन पिढीला चांगले विचार देण्याचा प्रयत्न केला, असेही त्यांनी सांगितले. शिरीष मोहिते म्हणाले, खिशात पैसे किती आहेत, त्यापेक्षा सामाजिक उपक्रम व ध्येयपूर्ती याकडे शाहिरांनी कायम लक्ष दिले. पराग ठाकूर म्हणाले, शाहिरी ही एक विलक्षण लोककला आहे. तरुण शाहिरांचे चैतन्य फुलविणारे शाहीर हेमंतराजे मावळे हे व्यक्तिमत्व आहे. पराक्रमाचे पोवाडे गाण्याची कला म्हणजे शाहिरी.



शाहीर मावळे यांनी केवळ पुरुष साधकांना नाही, तर स्त्रियांना देखील पोवाडे गायनाची कला शिकविली, असेही त्यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करीत शाहीर मावळे यांच्यासोबत काम करताना कला आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक अनुभव सांगितले.

‘मत वाचवा, देश वाचवा’ अभियानासाठी काँग्रेस सज्ज!

पुण्यात आमदार श्रीनिवास माने यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन; १ नोव्हेंबरला दिल्लीतील राष्ट्रीय रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन

■ पुणे (दै. संध्या)

‘मत वाचवा, देश वाचवा’ या देशव्यापी अभियानाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कर्नाटकातील हनगल विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा पुणे शहर जिल्हा काँग्रेसचे निरीक्षक श्रीनिवास माने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मतदारांचा घटनात्मक अधिकार, मतदार याद्यांमधील कथित अनियमितता आणि लोकशाही संस्थांच्या संरक्षणासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी सक्रियपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. काँग्रेस पक्षातर्फे इंडिया आघाडीतील सहयोगी पक्षांच्या समन्वयाने १ नोव्हेंबर २०२६ रोजी नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर भव्य राष्ट्रीय रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, खासदार, आमदार, प्रदेश व जिल्हास्तरीय पदाधिकारी, ब्लॉकस्तरीय नेते, आघाडी संघटनांचे प्रतिनिधी, विविध सेलचे पदाधिकारी आणि निष्ठावान कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. संवैधानिक संस्थांवर नियंत्रण मिळविण्याच्या प्रवृत्तीविरोधात आवाज उठवून देशाची एकजूट दाखविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित होईपर्यंत हा लढा सुरू ठेवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करून त्यांच्याविरुद्ध न्यायालयीन कार्यवाही करण्याची मागणीही त्यांनी मांडली. ‘मत वाचवा, देश वाचवा’ हे अभियान केवळ राजकीय आंदोलन नसून संविधानाने दिलेल्या मतदानाच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाशी संबंधित आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक निष्ठावान कार्यकर्त्याने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी एकजुटीने काम करावे, असे आवाहन माने यांनी केले. ही बैठक पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चौधरी आणि पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार उल्हास पवार, पुणे महानगरपालिका काँग्रेसचे गटनेते रामचंद्र ऊर्फ चंदूशेठ कदम, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, सुनील मलके, नगरसेवक साहिल केदारी, तस्लीम शेख, माजी नगरसेवक अविनाश बागवे, लता राजगुरू, उस्मान तांबोळी, कैलास गायकवाड, चंद्रशेखर कपोते, राजाभाऊ कदम, सचिन आडेकर, राजेंद्र शिरसाट, लतेंद्र भिंगारे, संतोष डोख, सुरेश नांगरे, धीरज खोरे यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी पुणे शहर काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष कैलास गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. १ नोव्हेंबरच्या दिल्लीतील राष्ट्रीय रॅलीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर काँग्रेसने संघटनात्मक तयारीला वेग दिला असून, मतदानाचा अधिकार आणि लोकशाही संस्थांच्या संरक्षणाचा मुद्दा जनतेपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात आहे.



मतदानाच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी लढा

आमदार श्रीनिवास माने यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२६ अंतर्गत असलेल्या मतदानाच्या अधिकारांच्या संरक्षणाची लढाई निर्णायक टप्प्यावर आली आहे. मतदार याद्यांमधून कथितरीत्या मनमानी पद्धतीने नावे वगळून मतदारांचा वैधानिक हक्क हिरावून घेतला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दीनिमित्त

‘मराठी भाषा दूत’ उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

मराठी भाषा विभागाचा अभिनव उपक्रम

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ‘मराठी भाषा दूत’ या राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेला महाराष्ट्राच्या विविध भागांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार, तरुणांमध्ये भाषेविषयी अभिमान निर्माण करणे आणि महात्मा जोतीराव फुले यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांची नव्या पिढीला ओळख करून देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

१६ ते २१ वर्षे वयोगटातील जगभरातील मराठी भाषक तरुणांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. मराठी भाषा, साहित्य, सामाजिक समता, स्त्री शिक्षण आणि सत्यशोधक विचारांचा वारसा तरुणांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वपूर्ण ठरला.

महात्मा फुले यांच्या विचारांना उजाळा

महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षण, सामाजिक समता, स्त्री सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात केलेले कार्य आजही समाजाला दिशादर्शक आहे. त्यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून मराठी भाषा विभागाने आयोजित केलेल्या या स्पर्धेत महात्मा जोतीराव फुले यांच्या जीवनकार्याशी संबंधित पाच विषय देण्यात आले होते.

यामध्ये ‘महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान’, ‘महात्मा फुले: आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार’, ‘महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण व स्त्री सक्षमीकरणातील योगदान’, ‘महात्मा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्फूर्तिस्थान’ आणि ‘महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार’ या विषयांचा समावेश होता. या विषयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या विचारांचा अभ्यास करून ते आपल्या भाषणातून मांडण्याची संधी मिळाली.

ज्येष्ठ परीक्षकांकडून परीक्षण

स्पर्धेच्या आयोजनासाठी मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील ग्रंथाली प्रतिभांगण ही वास्तू निवडण्यात आली होती. येथे दोन स्वतंत्र दालनांमध्ये एकाच वेळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दोन्ही दालनांमध्ये टीव्ही मॉनिटर्सच्या माध्यमातून परीक्षकांना स्पर्धकांचे सादरीकरण पाहून परीक्षण करता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली होती. स्पर्धेच्या परीक्षणासाठी ज्येष्ठ पत्रकार, लेखिका आणि अभ्यासक संजीवनी खेर, ज्येष्ठ नाट्यकर्मी व संगीत नाटक अकादमी पुरस्कारप्राप्त कलाकार प्रमोद पवार, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. सुनील रामटेके आणि ऐतिहासिक व्यक्तिरेखा अभ्यासक व चित्रपट प्रमाणन मंडळाचे सल्लागार योगेश कुलकर्णी यांचा सहभाग होता.

गजानन पाटील, विभागीय संपर्क अधिकारी

उत्कृष्ट वक्त्यांना ‘मराठी भाषा दूत’ म्हणून गौरविणार

२९ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन ऑगस्ट मिडिया व ट्रेनिंग, बेलापूर नवी मुंबई या संस्थेमार्फत करण्यात आले होते. प्रत्येक स्पर्धकाला आपले विचार मांडण्यासाठी तीन मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. पहिल्या टप्प्यात नोंदणी करणाऱ्या एक हजार स्पर्धकांना प्राधान्याने प्रवेश देण्याचे नियोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतून सर्वोत्तम १०० वक्त्यांची निवड ‘मराठी भाषा दूत’ म्हणून करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे त्यांना विशेष सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल. तसेच, स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ‘मराठी भाषा दूत’ हा सन्मान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठीही उपयुक्त ठरणार आहे.

महाराष्ट्रभर व्यापक जनजागृती मोहीम

स्पर्धेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, यासाठी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत व्यापक प्रचार मोहीम राबविण्यात आली. स्पर्धेत एक हजार स्पर्धक सहभागी झाले. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये, विद्यापीठे तसेच महाराष्ट्राबाहेरील मराठी मंडळांशी ई-मेल आणि दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला.

मुंबई, ठाणे, डोंबिवली आणि नवी मुंबई परिसरातील तब्बल ३४ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधून स्पर्धेची माहिती देण्यात आली, त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले आणि मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

या नियोजनबद्ध संपर्क मोहिमेमुळे स्पर्धेची माहिती विविध शैक्षणिक संस्थांपर्यंत पोहोचली. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तरुणांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने या उपक्रमाने महत्वाची भूमिका बजावली.

राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग : या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा विस्तार केवळ मुंबईपुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या विविध विभागांपर्यंत पोहोचला. पुण्यातील एस. पी. महाविद्यालय आणि फर्ग्युसन महाविद्यालय, कोल्हापूरमधील विविध महाविद्यालये, डोंबिवलीतील मॉडेल कॉलेज आणि नवी मुंबईतील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयासह अनेक शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

नाशिक, अमळनेर, जळगाव, परभणी कृषी विद्यापीठ, वर्धा, नागपूर आणि अमरावती येथील महाविद्यालयांतूनही मोठ्या प्रमाणावर प्रवेशिका प्राप्त झाल्या. कोकण, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, अमरावती, मुंबई तसेच बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषक तरुणांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या व्यापक सहभागातून मराठी भाषेविषयी तरुणांमध्ये असलेली आस्था आणि महात्मा फुले यांच्या विचारांबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता अधोरेखित झाली.

भाषेचे संवर्धन केवळ साहित्यनिर्मिती किंवा भाषिक उपक्रमांपुरते मर्यादित नसून, नव्या पिढीने त्या भाषेतून विचार मांडणे, संवाद साधणे आणि समाजपरिवर्तनाच्या विचारांचा स्वीकार करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ‘मराठी भाषा दूत’ वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून मराठी भाषा आणि महात्मा फुले यांच्या विचारांचा संगम घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तरुणांना मराठी भाषेतून प्रभावीपणे व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच सामाजिक समता, शिक्षण आणि परिवर्तनाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा हा उपक्रम मराठी भाषेच्या भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



विशेष स्टीलमुळे भारतीय नौदलाची पाणबुडीविरोधी युद्धक्षमता मजबूत

नवी दिल्ली : दैनिक संध्या

भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतांना अधिक बळकटी देण्याच्या प्रयत्नांदरम्यान, आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS India) ने देशाच्या नौदल आधुनिकीकरणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय नौदलाच्या माहे-क्लासमधील तिसऱ्या अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट (ASW-SWC) INS मंगरोलला नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले आहे. AM/NS इंडियाने पुरवलेल्या 100% विशेष स्टीलपासून तयार करण्यात आलेल्या INS मंगरोलला 12 ऑक्टोबर 2026 रोजी मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले. ही उपलब्धी भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राला आणि सागरी सुरक्षेला बळकटी देण्यात प्रगत भारतीय स्टील उत्पादनाचे वाढते योगदान अधोरेखित करते. AM/NS इंडियाचे संचालक आणि उपाध्यक्ष – विक्री व विपणन, श्री. रंजन धर म्हणाले, “INS मंगरोलचा नौदलात समावेश हा भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. आधुनिक नौदल प्लॅटफॉर्मच्या निर्मितीसाठी सर्वोच्च दर्जाचे आणि विश्वासार्ह विशेष स्टील आवश्यक असते. AM/NS इंडियाचे स्टील भारतीय नौदलाच्या आधुनिकीकरणाला हातभार लावत असून भारताच्या उत्पादन क्षमतेची ताकद अधोरेखित करत आहे, याचा आम्हाला अभिमान आहे.” INS मंगरोल ही भारतीय नौदलात दाखल झालेली माहे-क्लासमधील तिसरी अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट आहे. कोचीन शिपयार्ड लिमिटेड येथे 80% पेक्षा अधिक स्वदेशी सामग्रीचा वापर करून या नौकेची निर्मिती करण्यात आली आहे. ही नौका ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’ या उपक्रमांप्रती भारताची बांधिलकी दर्शवते.

जाहीर नोटीस

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस,

आमचे आशील श्री. संतोष सुरेश चावरे, रा. पाडळी, भिमनगर, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे आज समक्ष जुन्नर यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे :-

१) मिळकतिचे वर्णन :- शहर जुन्नर येथील जुन्नर नगर परिषदेचे हद्दीतील जुन्नर नगर परिषद मालमत्ता क्र. ZCB ३६००४२८५ जुना मालमत्ता क्र. १३ (१).

येणे प्रमाणे वर्णनाची निवासी घर मिळकत त्यातील तदंगभूत व अंगभूत वस्तुंसहीत तसेच त्यातील जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह दरोबस्त मिळकत.

२) वर कलम १ यात नमूद केलेली मिळकत ही आमचे आशिलांचे जनक पिता श्री. सुरेश जुम्मन चावरे यांचे नावे जुन्नर नगर परिषदेचे रेकॉर्ड ऑफ राईटला नोंदलेली असली तरी सदरहू मिळकतीमध्ये आमचे आशिलांचा समाईकात मालकी हक्क व हिस्सा असून सदरहू मिळकतीमध्ये आमचे आशील, त्यांचे जनक पिता सुरेश जुम्मन चावरे हे त्यांचे कुटुंबियांसमवेत वास्तव्यास आहेत. अशी परिस्थिती असताना आमचे आशिलांचे जनक पिता श्री. सुरेश जुम्मन चावरे हे काही आर्थिक, अनुचीत लाभ उठविणेचे इराद्याने व त्याअनुषंगाने आमचे आशिलांस फसविण्याचे हेतुने वर नमूद मिळकतिचे संदर्भात काही अनाधिकाराचा, बिनताब्याचा व्यवहार करण्याचे अगर त्याअनुषंगाने करार-मदार करण्याचे प्रयत्नात असल्याचे आमचे आशिलांस खात्रीलायकरित्या समजते. परंतू तसला कुठलाही व्यवहार वर नमूद मिळकतीमधील आमचे आशिलांचे कायदेशीर हक्कावर, सदरहू मिळकतीमधील समाईकातील कायदेशीर हिश्यावर तसेच उपरोक्त मिळकतीमधील आमचे आशिलांचे असलेल्या ताब्यावर बंधनकारक ठरणार नाहीत. तसेच संबंधीत व्यक्तीस उपरोक्त मिळकतिची मालकी व ताबा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

३) तरी सर्व लोकांस अशी समज देणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतिचे संदर्भात श्री. सुरेश जुम्मन चावरे यांचेबरोबर कोणीही खरेदी, विक्री, दान, गहाण, लिज, बक्षीस, अगर त्याअनुषंगाने अन्य कुठल्याही प्रकारे तबदिलीचे व्यवहार व करार-मदार करू नयेत.

तद्वत वित्त पुरवठा करणारे कुठल्याही संस्थांनी वर नमूद मिळकतीवर कर्ज पुरवठा करून तारणाचे व्यवहार करू नयेत. तसले कुठलेही व्यवहार कायदेशीर ठरणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. २६/१०/२०२६
श्री. गणेश किसन डेरे (ॲडव्होकेट)
पत्ता :- मु. वैष्णवधाम, पो. पारुंडे, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२
ऑफीस :- गणपुले कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा नं. ३, महाजन आळी, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे, मो.नं. ७७५८०३३६७०

आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या नफ्यात १९६.५% वाढ

■ मुंबई (दै. संध्या)

आयडीएफसी फर्स्ट बँकेने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत बँकेचा करपश्चात निव्वळ नफा (पीएटी) वार्षिक तुलनेत १९६.५ टक्क्यांनी वाढून १,०४५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या तिमाहीत बँकेने एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निव्वळ नफा नोंदवला आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत बँकेचा एकूण निव्वळ नफा २,१२० कोटी रुपये झाला असून, या कालावधीत मालमत्तेवरील परतावा (आरओए) ०.९९ टक्के नोंदवण्यात आला आहे. बँकेच्या नफ्यातील वाढीसोबतच ठेवींचे संकलन, कर्जवाटप आणि परिचालन कार्यक्षमतेतही सुधारणा झाल्याचे तिमाही निकालांतून स्पष्ट झाले आहे. ठेवी ३.४८ लाख कोटींच्या पुढे बँकेच्या एकूण ठेवींमध्ये वार्षिक तुलनेत २५.९ टक्के, तर मागील तिमाहीच्या तुलनेत ११.८ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण ठेवी ३,४८,५८३ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. दुसरीकडे, बँकेच्या एकूण कर्जे आणि अग्रिम रकमेत वार्षिक तुलनेत ३०.१ टक्के वाढ होऊन ती ३,४६,९१३ कोटी रुपये झाली आहे. एफसीएनआर (बी) ठेवींच्या तारणावर दिलेली कर्जे वगळल्यास, आयबीपीसीपूर्व आधारावर कर्जवाढ २२.२ टक्के राहिली आहे. बँकेचे सरासरी चालू खाते आणि बचत खाते (सीएएसए) ठेवींचे प्रमाण दुसऱ्या तिमाहीत ४८.४ टक्के नोंदवण्यात आले. मागील तिमाहीत हे प्रमाण ५०.१ टक्के होते. एफसीएनआर (बी) ठेवींच्या मोठ्या प्रमाणातील संकलनामुळे या प्रमाणात किरकोळ घट झाल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे.

इसुझू मोटर्स इंडियाच्यावतीने श्री सिटी प्लांटमध्ये सर्वोत्तम निर्मितीची १० वर्षे साजरी

मेक-इन-इंडियाचे एक दशक साजरे करणे आणि इसुझूच्या मोनोझुकुरी उत्पादन तत्त्वज्ञान तसेच भारतीय क्षमतांवर आधारलेला एक मजबूत पाया तयार करणे.

■ चेन्नई (दै. संध्या)



जपानमधील इसुझू मोटर्स लिमिटेडची उपकंपनी असलेल्या इसुझू मोटर्स इंडियाने (आयएमआय) आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील आपल्या आधुनिक उत्पादन सुविधेत भारतातील वाहनांच्या निर्मितीचे दशक साजरे केले. एप्रिल 2016 मध्ये शुभारंभ करण्यात आलेले इसुझूचे हे सुविधाकेंद्र म्हणजे देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठेसाठी एक प्रमुख मोनोझुकुरी उत्पादन केंद्र म्हणून विकसित झाले आहे.

हा प्रवास भारतातील उत्पादनासाठी इसुझू'ची वचनबद्धता तसेच भारतासाठी आणि मध्य पूर्व (सौदी अरेबिया, बहरीन, कतार, कुवेत, ओमान आणि जॉर्डन) आणि आशिया (नेपाळ, भूतान आणि बांगलादेश) यासारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसह जगासाठी जागतिक स्तरावर दर्जेदार उत्पादने वितरीत करण्याचे त्याचे तत्वज्ञान प्रतिबिंबित करतो. जपानच्या इसुझू मोटर्स लिमिटेडचे प्रेसिडेंट आणि रिप्रेझेंटेटीव्ह डायरेक्टर, सीईओ नाओहिरो यामागुची यांनी गेल्या दशकात पाहुणे होते. आंध्र प्रदेश सरकारचे उद्योग आणि वाणिज्य सचिव डॉ. एन.युवाराज, आयएएस त्याचप्रमाणे श्री सिटीचे संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. रवींद्र सन्ना रेड्डी यांच्यासह इतर मान्यवर आणि आयएमआयचे प्रतिनिधी सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना जपानच्या इसुझू मोटर्स लिमिटेडचे प्रेसिडेंट आणि रिप्रेझेंटेटीव्ह डायरेक्टर, सीईओ नाओहिरो यामागुची यांनी गेल्या दशकात इसुझू मोटर्स इंडियाच्या उल्लेखनीय प्रगतीबद्दल आणि कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला. "आमच्या सामूहिक समर्पणाने आणि मेहनतीने लक्षणीय परिणाम दिले आहेत. आर्थिक वर्ष 2022 पासून, आयएमआय'ने सातत्यपूर्ण नफा कमावला असून आमच्या निर्यात व्यवसायात जोरदार वाढ झाली आहे. इसुझू'च्या जागतिक व्यवहारांसाठी भारत ही धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची बाजारपेठ आहे. देशांतर्गत बाजारपेठेतील वाढीस गती देतानाच आपला निर्यात व्यवसाय बळकट करण्यावर आमचे लक्ष केंद्रित आहे," असे ते म्हणाले.

एशियन पेंट्स साजरा करत आहे दिवाळीच्या तयारीचा आनंद

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



दिवाळीचा खरा उत्साह साजरा करत, एशियन पेंट्स सादर करत आहे 'तैय्यारी शुरू, त्योहार शुरू'. ही एक म्युझिकल ॲड फिल्म आहे, जी दाखवते की दिवाळीची खरी सुरुवात तर घरातल्या तयारीनेच होते. दिवाळीचा उत्साह सण येण्याच्या खूप आधीच सुरू होतो. घराची साफसफाई आणि सजावटीपासून ते घराला नवीन रंगाचा फ्रेश कोट देण्यापर्यंत, प्रत्येक काम सणाच्या तयारीचा एक भाग बनून जातं. जेव्हा कुटुंब, भाऊ-बहिण, नातेवाईक आणि मित्र-मैत्रिणी दिवाळीसाठी त्यांची घरे तयार करायला एकत्र येतात, तेव्हा रोजची साधी कामं सुद्धा कशी हास्यविनोदाचे आणि एकत्र येण्याचे क्षण बनतात, हे या फिल्ममध्ये दाखवलं आहे. ही कॅम्पेन दिवाळीच्या तयारीतील उत्साह एका रंगीबेरंगी म्युझिकलमधून जिवंत करते. यात एक आकर्षक,पावले थिरकायला लावणारी धून आणि मजेशीर गाणी आहेत. एशियन पेंट्सने भिंती रंगवण्यापासून ते साफसफाई आणि सजावटीपर्यंत, प्रत्येक तयारीला एका जिवंत साजरेपणात बदलताना ही फिल्म दाखवते, ज्यात कुटुंबे आपल्या प्रियजनांच्या स्वागतासाठी घर तयार करत आहेत. दिवाळीच्या दिवसांत घराची बदलती भूमिका एशियन पेंट्सला किती चांगली समजली आहे, हे या कॅम्पेनमधून दिसून येतं. नव्याने रंगवलेलं घर हे सणासाठी केवळ एक बॅकड्रॉप नसतं. त्यातून या सणाचा उत्साह, एकमेकांची काळजी आणि एकत्र येण्याची भावना दिसून येते. घरं जशी नव्याने तयार होतात, तशी नातीही घट्ट होतात आणि दिवाळीचा खरा उत्साह जिवंत होतो.

मानवी दुग्धपेढी व्यवस्थापनाला तंत्रज्ञानाची जोड

■ पुणे (दै. संध्या)

- व्हिक्चुअल्स लाइफसायन्सेसकडून डिजिटल सॉफ्टवेअर विकसित
- दुधाच्या संकलनापासून वितरणापर्यंत प्रत्येक टप्प्याचा मागोवा घेण्यास मदत
- सुरक्षितता, कार्यक्षमता आणि नोंद व्यवस्थापनावर भर

नवजात बालकांच्या आरोग्यसेवेत मानवी दुग्धपेढ्यांचे महत्त्व वाढत असताना, पुणेस्थित व्हिक्चुअल्स लाइफसायन्सेसने मानवी दुग्धपेढ्यांचे व्यवस्थापन अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी डिजिटल सॉफ्टवेअर विकसित केले आहे. 'व्हिक्चुअल्स ह्युमन मिल्क बँक सॉफ्टवेअर'च्या माध्यमातून दूध संकलन, प्रक्रिया, पाश्चरायझेशन, साठवणूक आणि वितरण या संपूर्ण प्रक्रियेचे डिजिटल व्यवस्थापन व दुधाचा मागोवा घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुदतपूर्व जन्मलेली, कमी वजनाची किंवा वैद्यकीयदृष्ट्या नाजूक स्थितीतील अर्भके, ज्यांच्या मातांकडून पुरेशा प्रमाणात स्तन्य उपलब्ध होऊ शकत नाही, अशा परिस्थितीत दात्यांकडून मिळणारे मानवी दूध महत्त्वाचे ठरते. त्यामुळे मानवी दुग्धपेढ्यांमध्ये दूधदात्यांची नोंदणी व तपासणी, दूध संकलन, प्रयोगशाळा चाचण्या, पाश्चरायझेशन, साठवणूक आणि पात्र अर्भकांना वितरण अशा अनेक प्रक्रियांचे अचूक व्यवस्थापन आवश्यक असते. पारंपरिक पद्धतीमध्ये या प्रक्रियांपैकी अनेक बाबी कागदपत्रे आणि हाताने नोंदी ठेवण्यावर अवलंबून असतात.

‘चिन्मय मिशन’चा तीन दिवसीय जागतिक संमेलनाचा समारोप

चिन्मय चळवळीच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचा भव्य उत्सव

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

चिन्मय मिशनने आज नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित तीन दिवसीय चिन्मय अमृत महोत्सव जागतिक संमेलनाचा समारोप केला. चिन्मय चळवळीच्या ७५ वर्षांच्या पूर्ततेनिमित्त वर्षभर आयोजित करण्यात आलेल्या उत्सवांचा हा समारोप होता. भारतासह परदेशातून आलेल्या ९,००० हून अधिक सहभागींच्या उपस्थितीत पार पडलेल्या या संमेलनात पूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांच्या चिरंतन वारशाचा गौरव करण्यात आला. आध्यात्मिक प्रवचने, सांस्कृतिक सादरीकरणे, विविध पिढ्यांमधील संवाद आणि प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित उपक्रमांच्या माध्यमातून मिशनच्या तात्त्विक विचारांचा समकालीन जीवनाशी संबंध अधोरेखित करण्यात आला.

या संमेलनाचे उद्घाटन २३ ऑक्टोबर रोजी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. गुरुदेवांच्या शिकवणी नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी मिशन करत असलेल्या प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली. तसेच, राष्ट्रनिर्मितीमध्ये युवा शक्तीची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. तीन दिवसीय संमेलनाच्या समारोपाच्या दिवशी माननीय परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि भारतातील संयुक्त राष्ट्रांचे निवासी समन्वयक स्टीफन प्रीस्नर यांनीही सहभाग घेतला. याशिवाय, सुमारे ८० राजदूतांच्या मान्यवर प्रतिनिधीमंडळाची उपस्थिती या संमेलनाला लाभली. यावरून या उपक्रमाची आंतरराष्ट्रीय व्याप्ती आणि विविध समुदाय व राष्ट्रांमध्ये संवाद तसेच परस्पर समज वाढविण्यासाठी वेदांत तत्त्वज्ञानाचे असलेले महत्त्व स्पष्ट झाले.

तीन दिवसीय संमेलनात आध्यात्मिक चिंतन, युवकांचा सहभाग, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या माध्यमातून स्वामी चिन्मयानंद यांच्या वारशाचा आणि चिन्मय चळवळीच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचा उत्सव साजरा करण्यात आला. मुलांसाठी आयोजित विशेष शिशु विहार आणि बाल विहार सत्रांपासून ते अनुभवसमृद्ध चिन्मय अमृत गंगा प्रदर्शन, होलोबॉट अनुभव आणि मिशनच्या उपक्रमांची ओळख करून देणाऱ्या व्हर्च्युअल रिॲलिटी अनुभवांपर्यंत, गुरुदेवांच्या शिकवणीशी जोडले जाण्याच्या विविध संधी सहभागींसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. या सोहळ्यात ग्रॅमी पुरस्कार विजेते संगीतकार रिकी केज यांचा संगीत कार्यक्रम आणि चित्रपट दिग्दर्शक मणि शंकर यांच्या दिग्दर्शनाखाली सादर करण्यात आलेले ‘द चिन्मय म्युझिकल – द अवेकनिंग’ हे संगीतनाट्यही विशेष आकर्षण ठरले. संगीत, नृत्य आणि कथाकथनाच्या माध्यमातून गुरुदेवांचे जीवन आणि त्यांचे विचार या सादरीकरणांतून उलगडण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यात चिन्मय अमृत यात्रेच्या उल्लेखनीय प्रवासाचाही गौरव करण्यात आला. ही ३०० दिवसांची आध्यात्मिक यात्रा भारत, नेपाळ आणि श्रीलंका या देशांमधून सुमारे ४०,००० किलोमीटरचा प्रवास करत या प्रदेशातील विविध समुदायांपर्यंत गुरुदेवांची शिकवण घेऊन पोहोचली. ३१ डिसेंबर २०२५ रोजी पुण्यातील चिन्मय विभूती येथून सुरू झालेल्या या यात्रेदरम्यान गुरुदेवांच्या शिकवणी, पवित्र वस्तू आणि ऐतिहासिक अभिलेखांतील सामग्री विविध ठिकाणी नेण्यात आली. प्रार्थना, ज्ञानार्जन आणि सेवाकार्याच्या माध्यमातून या यात्रेने विविध समुदायांतील लोकांना एकत्र आणले.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाय... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महर्षि वाल्मिकी जयंतीनिमित्त अभिवादन

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने थोर महर्षि वाल्मिकी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारत येथील झालेल्या कार्यक्रमात महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेस उपमहापौर शर्मिला बाबर आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मुख्य प्रशासकीय इमारतीमधील कार्यक्रमास विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सह आयुक्त मनोज लोणकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच आरोग्य विभाग तक्रार निवारण समितीचे माजी उपाध्यक्ष ॲड.सागर चरण, सामाजिक कार्यकर्ते राजेश बडगुजर, सोमनाथ बेद, विष्णू चावरिया, राहुल चावरिया, नरेश गुहर, अशोक वाल्मिकी, अनिल लखण, प्रकाश सौदा, ओमप्रकाश सौदा,मुकेश बंदमड, सुशील खैरालिका, सुनील चटोले यांच्यासह विविध विभागातील कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. तर यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील कार्यक्रमास विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेविका अनुराधा गोरखे, वर्षा जगताप, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र वाबळे,उप अधिक्षक डॉ.मनिषा सुर्यवंशी,भूलतज्ञ डॉ.मारूती गायकवाड, नोडल अधिकारी डॉ.छाया शिंदे, मेट्रन वत्सला वाजे,स्वाती कुलकर्णी,आरोग्य निरिक्षक अमोल गोरखे, आरोग्य सहाय्यक मोहन वाघमारे तसेच अभिषेक फुगे,नंदू कानडे, प्रेमकुमार रेनवा,निलेश बहुले आदी उपस्थित होते.





दुर्गा टेकडीवरील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाला नागरिकांचा तीव्र विरोध

- ऑक्सिजन पार्क उभारण्याची मागणी
- हजारो नागरिक रस्त्यावर उतरले
- दुर्गा टेकडी वाचविण्यासाठी महापालिकेविरोधात आंदोलन

पिंपरी : दैनिक संध्या

शहरातील दुर्गा टेकडी परिसरात प्रस्तावित वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाला रावेत, निगडी प्राधिकरण परिसरातील नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या प्रकल्पाऐवजी दुर्गा टेकडी परिसरात स्वर्गीय लोकनेते अजित पवार ऑक्सिजन पार्क उभारण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दुर्गा टेकडी वाचविण्यासाठी रविवारी (दि.२५) संध्याकाळी हजारो नागरिक रस्त्यावर उतरले होते. यावेळी नागरिकांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रस्तावित प्रकल्पाविरोधात जोरदार आंदोलन केले. दुर्गा टेकडी परिसरात वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारल्यास परिसरातील पर्यावरणावर गंभीर परिणाम होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. या प्रकल्पामुळे हवेचे प्रदूषण वाढण्याची शक्यता असून, नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी चिंता आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. तसेच प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होण्याची शक्यता असल्याने टेकडीवरील नैसर्गिक संपत्ती आणि हरित क्षेत्राला धोका निर्माण होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. दुर्गा टेकडी ही परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची नैसर्गिक संपत्ती असून, तिचे संरक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेने या ठिकाणी वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारण्याचा निर्णय मागे घ्यावा आणि त्याऐवजी स्वर्गीय लोकनेते अजित पवार यांच्या नावाने ऑक्सिजन पार्क विकसित करावे, अशी मागणी नागरिकांनी केली. दुर्गा टेकडीचे पर्यावरण जपून परिसरात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी महापालिकेने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका रावेत, निगडी प्राधिकरण परिसरातील नागरिकांनी आंदोलनातून मांडली.



वाकडमध्ये अननसने भरलेला ट्रक उलटला; अननस उचलण्यासाठी नागरिकांची गर्दी

वाकड : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरातील वाकड परिसरात जिंजर हॉटेलसमोर अननसाने भरलेला मालवाहू ट्रक उलटल्याची घटना घडली. या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून, हजारो अननस रस्त्यावर विखुरले. मात्र, अपघातानंतर मदतीसाठी पुढे येण्याऐवजी रस्त्यावर पडलेले अननस गोळा करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले. या प्रकारामुळे नागरिकांच्या सामाजिक संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाकड येथील जिंजर हॉटेलसमोर अननसाने भरलेला मालवाहू ट्रक अचानक उलटला. या दुर्घटनेत ट्रकचे मोठे नुकसान झाले, तर ट्रकमधील हजारो अननस रस्त्यावर विखुरले. अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांची गर्दी जमली. यावेळी काही संवेदनशील नागरिकांनी पुढाकार घेत चालकाला आणि जखमींना मदत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुसरीकडे अनेक नागरिकांनी रस्त्यावर पडलेले अननस गोळा करून नेण्यासाठी गर्दी केली. दुसऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असताना, त्यातून स्वतःचा फायदा मिळविण्याची ही मानसिकता पाहून उपस्थितांकडून नाराजी व्यक्त होत आहे. अपघातासारख्या आपत्कालीन परिस्थितीत सर्वप्रथम जखमींना मदत करणे, चालकाच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी सहकार्य करणे अपेक्षित असते. मात्र, या घटनेत काही नागरिकांनी मदतीचा हात दिला, तर अनेकांनी रस्त्यावर विखुरलेल्या अननसांचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला.

शिक्षक मतदार संघांच्या मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज

■ पिंपरी (दै. संध्या)

विधान परिषदेसाठी होणाऱ्या पुणे विभाग पदवीधर व पुणे विभाग शिक्षक मतदार संघांच्या निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया नियुक्त सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी समन्वयाने अचूक, शांततेत आणि ताणरहित पद्धतीने यशस्वी करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिले. पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघांची मतमोजणी मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडीच्या बॅडमिंटन हॉलमध्ये होणार आहे. या अनुषंगाने मतमोजणी कक्षात मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी श्रीमती तेली- उगले म्हणाल्या, मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करण्याचे काम केले आहे. मतमोजणीच्या फेरीदरम्यान शांततेत, चूक होऊ न देता आणि कोणतेही दडपण न घेता काम करावे. व्यवस्थित सर्व नमुने भरून संबंधित पथकाकडे जमा करावेत. नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक तेथे मार्गदर्शन, मदत देण्यात येईल. मतपत्रिका वैध अवैध बाबतचे मुद्दे, आक्षेप योग्यरित्या निकाली काढावेत. मतपत्रिकांवरील पसंतीक्रमानुसार मतमोजणीची प्रक्रिया असल्याने प्रत्येक टप्प्यावर विशेष काळजी घ्यावी. प्रत्येक टेबलवरील पथकाने काळजीपूर्वक आणि अचूक काम करावे. प्रत्येकाने आपापली जबाबदारी योग्यरित्या पार पाडावी. मतमोजणी प्रक्रियेत टेबलवरील पर्यवेक्षक, सहायक, संबंधित अधिकारी आणि माहिती संकलन करणाऱ्या पथकांमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याचे श्रीमती तेली-उगले यांनी सांगितले. निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान आपल्या शंकांचे निरसन करून घ्यावे. मतमोजणीच्या दिवशी कोणतीही संदिग्धता राहू नये, यासाठी आवश्यक नियम, सूचना आणि कार्यपद्धतींचा अभ्यास करावा, असेही त्या म्हणाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर यांनी शिक्षक मतदार संघातील मतमोजणी अधिकारी कर्मचाऱ्यांना आणि सह आयुक्त संजय पलांडे यांनी पदवीधर मतदार संघातील अधिकाऱ्यांना मतमोजणीशी संबंधित बाबींचे सविस्तर प्रशिक्षण दिले. मत मोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या शंकांचे श्री. पलांडे व श्री. आनंदकर यांनी निरसन केले. यावेळी मतमोजणीची प्रक्रिया निर्धारित नियमांनुसार, वेळेत आणि काटेकोरपणे पार पाडण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणात विविध बाबी स्पष्ट करण्यात आल्या. मतपेट्या उघडणे, ५० मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करणे, भरायचे विविध नमुने, मतपत्रिका वैध, अवैध अचूक वर्गीकरण करणे, प्रत्येक फेरीनुसार निकाल नमुना जमा करणे आदींसह मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया यांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. मतमोजणीसाठी करण्यात आलेल्या सर्व सुविधा व नियोजनाची माहिती यावेळी देण्यात आली.



अशी होणार मतमोजणी

- पदवीधर मतदार संघाच्या मतमोजणीसाठी १०० टेबल असणार आहेत. यासाठी ५ कक्षात प्रत्येकी १० टेबलच्या २ रांगा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.
- शिक्षक मतदार संघाच्या मतमोजणीसाठी ४२ टेबल असणार आहेत. यासाठी ३ कक्षात प्रत्येकी ७ टेबलच्या २ रांगा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.
- प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, दोन मतमोजणी सहायक आणि एक शिपाई असा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या बनावट लोगोचा वापर

■ पिंपरी (दै. संध्या)

राज्य निवडणूक आयोगाच्या नावाचा आणि अशोक स्तंभ व राजमुद्रेचा बनावट लोगो तयार करून वाहनावर लावल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवडमध्ये दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शगुन चौक येथे पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांनी एका महिंद्रा स्कॉर्पियो कारची तपासणी केली असता हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शगुन चौक येथे पेट्रोलिंग सुरू असताना काळ्या रंगाची फिल्म लावलेली आणि नंबर प्लेट नसलेली महिंद्रा स्कॉर्पियो कार पोलिसांनी अडवली. वाहनाची तपासणी केली असता, कारच्या पुढील आणि मागील काचेवर अशोक स्तंभ व राजमुद्रा असलेला लोगो लावण्यात आल्याचे दिसून आले. या लोगोवर 'राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र नगराध्यक्ष' असे नमूद करण्यात आले होते. हातातोंडाशी आलेला घास हिरावला आत कारवाई केली नाही, तर शिवशाही शासन पक्ष व अखिल भारतीय हिंदू मातंग संघाच्या वतीने ड प्रभाग कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा हिंदू मातंग सेनेचे संस्थापक अध्यक्ष युवराज भगवान दाखले यांनी केला आहे.



■ पिंपरीत स्कॉर्पियो चालकासह दोघांवर गुन्हा दाखल

राज्यातील शेतकरी काळी दिवाळी साजरी करणार : काळे

■ पिंपरी (दै. संध्या)

राज्यात दुष्काळ जाहीर होऊन अनेक दिवस उलटले तरीही राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारकडून अद्याप कोणत्याही प्रकारची ठोस मदत मिळालेली नाही. शेतकऱ्यांना मदतीची आश्वासने दिली जात आहेत मात्र प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, सरकारच्या या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ राज्यातील शेतकरी यंदाची दिवाळी काळी दिवाळी म्हणून साजरी करणार आहेत अशी माहिती संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या ठोस उपाययोजना करणे ही केंद्र व राज्य सरकारची जबाबदारी आहे. मात्र, दुष्काळ जाहीर करूनही शेतकऱ्यांना अपेक्षित मदत मिळत नसल्याने शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी आहे. सरकारकडून केवळ आश्वासने दिली जात असून, प्रत्यक्ष मदतीबाबत ठोस निर्णय आणि अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप सतीश काळे यांनी केला.

दिवाळी हा सण आनंदाचा, प्रकाशाचा आणि समृद्धीचा असला तरी आज राज्यातील अनेक शेतकरी आर्थिक विवंचनेत आहेत. शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक संकट असताना सरकारच्या केवळ आश्वासनांवर समाधान मानून सण साजरा करणे शक्य नाही. त्यामुळे सरकारच्या निषेधार्थ शेतकरी बांधवांनी आपल्या घरावर काळा झेंडा फडकवून काळी दिवाळी साजरी करावी असे आवाहन काळे यांनी केले आहे. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी पीक नुकसानीची योग्य भरपाई मिळावी आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी मागणीही त्यांनी केली. राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या घरावर काळा झेंडा फडकवून केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा निषेध नोंदवावा असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी केले आहे.

फुटपाथ चोरांमुळे काळेवाडी, रहाटणीतील जनता रस्त्यावर

■ पिंपरी (दै. संध्या)

प्रभाग क्रमांक २७, तापकीर नगर, काळेवाडी येथे हॉटेल राजरत्न शेजारी बांधकाम व्यावसायिकाने मुजोरीचा कळस गाठला आहे. येथे 'लोटस् इन' नावाचे लॉजिंग बांधताना सर्वसामान्य जनतेसाठी असलेला सार्वजनिक फुटपाथच पूर्णपणे गायब केला आहे. ही फुटपाथ चोरी नसून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्तेवर दिवसाढवळ्या टाकलेला दरोडाच आहे.

या मुख्य रस्त्यावर दररोज शेकडो शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, कामगार ये-जा करतात. फुटपाथ अस्तित्वात नसल्याने त्यांना भर रस्त्यातून जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता असूनही ड प्रभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या गंभीर प्रकरणी तात्काळ कारवाई करावी, संबंधित बांधकाम व्यावसायिकावर सार्वजनिक मालमत्तेची चोरी व अतिक्रमण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून फुटपाथ तात्काळ मोकळा करावा, अशी लेखी तक्रार ड प्रभाग अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. जर प्रशासनाने ८ दिवसाच्या



राष्ट्र सेविका समितीचे सघोष पथसंचलन आणि शस्त्रपूजन उत्साहात संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

■ पुणे जिल्ह्यातील सुमारे ३५० सेविकांचा सहभाग; शंखवादन ठरले विशेष आकर्षण

राष्ट्र सेविका समिती, पुणे जिल्हा यांच्या वतीने सघोष पथसंचलन आणि शस्त्रपूजनाचा कार्यक्रम रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पिंपळे सौदागर येथे उत्साहात संपन्न झाला. संपूर्ण पुणे जिल्ह्यातून जवळपास ३५० सेविका या संचलनात उत्साहाने सहभागी झाल्या. या कार्यक्रमाला राष्ट्र सेविका समितिच्या पश्चिम क्षेत्र कार्यवाहिका सुनंदाताई जोशी, प्रांत प्रचार प्रमुख मायाताई देशपांडे, पुणे विभाग कार्यकारिणी तसेच पुणे जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते. पुणे जिल्हा कार्यवाहिका भारतीताई तारे आणि प्रांत सहशारीरिक प्रमुख सायलीताई होमकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. तसेच आमदार उमाताई खापरे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, नगरसेवक शत्रुघ्न काटे, नगरसेविका अनिताताई काटे, कुंदाताई भिसे यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. संचलनादरम्यान सेविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने पथसंचलन केले. परिसरातील नागरिकांनी ठिकठिकाणी संचलनाचे उत्साहात स्वागत केले. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सेविकांचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शंखवादन. शंखवादनामुळे कार्यक्रमाला पारंपरिक आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप प्राप्त झाले. सघोष पथसंचलन, शस्त्रपूजन आणि शंखवादनाच्या माध्यमातून राष्ट्र सेविका समितीच्या सेविकांनी एकजुटीचे आणि शिस्तीचे दर्शन घडविले.

पिंपळे सौदागर येथे भाजपा युवा मोर्चाची मासिक बैठक

- 'मन की बात'चा १३९ वा भाग उत्साहात संपन्न
- शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आणि आमदार शंकर जगताप यांची प्रमुख उपस्थिती
- युवा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग

■ पिंपरी (दै. संध्या)

भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने मासिक बैठक आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या १३९ व्या भागाचे सामूहिक श्रवण पिंपळे सौदागर येथील आतिथ्य एवेन्यू सोसायटीमध्ये उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या माध्यमातून देशवासीयांशी साधलेला संवाद, राष्ट्रहिताचे विचार आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेला संदेश उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे ऐकला.

युवकांमध्ये राष्ट्रसेवेची भावना दृढ करणे, समाजहिताच्या कार्यासाठी प्रेरणा मिळविणे आणि केंद्र सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी भाजपा युवा मोर्चाच्या मासिक बैठकीत संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. युवकांचा संघटनेतील सहभाग वाढविणे, आगामी उपक्रमांचे नियोजन आणि पक्षाचे विचार तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांनुसार राष्ट्रसेवा आणि समाजहिताच्या कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार उपस्थित युवा कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे संयोजन सरचिटणीस दिनेश काटे पाटील, उपाध्यक्ष गौरव शिरुडे आणि सचिव गोपाल मंडल यांनी केले. यावेळी भाजपा शहर सरचिटणीस मधुकर बच्चे, भाजपा युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्री तेजस्विनी दुर्गे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव, युवा मोर्चाचे माजी महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा प्रभारी अजित कुलथे, सरचिटणीस प्रसाद कस्पटे, साची दोशी, राजेश डोंगरे, जयनाथ काटे, संदेश काटे पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक सुरेश वाळुंज, उपाध्यक्ष अमित देशमुख, मनोज घोडेकर, दयानंद बंडगर, विशाल वाघेरे, आदर्श उपाध्याय, सचिव आदम मुलानी, निखिल शहाणे, जगदीश येवले, जालिंदर काटे, रोहित कराळे, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप नाईक, मंडल अध्यक्ष ऋषिकेश भालेकर, प्रदीप पवार, रोजगार व स्वयंरोजगार शहर संयोजक नितीन साळी, महिला संयोजिका योगिता जाधव, उद्योग आघाडी शहर संयोजक आदित्य कुलकर्णी, युवती विभाग सहसंयोजिका तेजल कांबळे, विद्यार्थी विभागाचे हर्ष कुंजीर, गौरव शिंदे, हेमंत वर्मा, गौरव बनसोडे, रवींद्र गायकवाड, आदित्य राजे, रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे उमाकांत लिंगाडे, नीलम कौशल, श्रीधर महाले, उद्योग आघाडीचे दिपराज गुप्ता, अजय बामणे, अभिषेक बामणे, महेश धनलोभे, दिवाकर महाजन आणि रोहित बिरादार यांच्यासह भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सरचिटणीस दिनेश काटे पाटील यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. राष्ट्रसेवा, संघटन बळकटीकरण आणि युवकांचा सक्रिय सहभाग या उद्देशाने भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.



थोडक्यात पण महत्वाचे



टोरेंट प्रकल्प रद्द करून वृक्षतोड थांबवा; वकील संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

नारायणगाव : दैनिक संध्या

टोरेंट विद्युत प्रकल्पाकरिता भीमाशंकर अभयारण्यजवळ सुरू असलेली वृक्षतोड तात्काळ थांबविण्यात यावी तसेच सदरील प्रकल्प रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी राजगुरुनगर वकील संघटनेच्या वतीने खेड तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. भीमाशंकर अभयारण्य हे पर्यावरणीय आणि जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून, येथील वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरील वृक्षतोड तात्काळ थांबवून प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी राजगुरुनगर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. अतुल उर्फ प्रदीप गोरडे, संघटनेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब लिंबोरे, अनिल राक्षे व अरुण मुळुक, ज्येष्ठ विधिज्ञ पोपटराव तांबे-पाटील, मानिकराव पाटोळे साहेब, मुकुंदराव आवटे, चंद्रकांत सांडभोर, कृष्णा भोगाडे, अजय पडवळ, अविनाश बोऱ्हाडे, गणेश गाडे, ॲड.काळे, ॲड.सुदीप परदेशी, ॲड.अमोल तळेकर, ॲड.महेश चौधरी, ॲड.सुरेखा कड, ॲड.शुभांगी निघोट, रेश्मा बिरदवडे यांच्यासह राजगुरुनगर वकील संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरणाचे संरक्षण, वनसंपदेचे संवर्धन आणि भावी पिढ्यांचे हित लक्षात घेऊन सदरील वृक्षतोड तात्काळ थांबवावी व प्रकल्प रद्द करण्याबाबत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका यावेळी राजगुरुनगर वकील संघटनेच्या वतीने मांडण्यात आली.

बालकुमार साहित्य संमेलन २०२६ अंतर्गत शिवांश बंडगर इंदापूर तालुक्यात प्रथम



वालचंदनगर : दैनिक संध्या

पुणे जिल्हा परिषद आयोजित बालकुमार साहित्य संमेलन २०२६ अंतर्गत इंदापूर तालुकास्तरीय विविध स्पर्धा निमगाव केतकी येथे उत्साहात पार पडल्या. यामध्ये चित्रकला स्पर्धेत इयत्ता पहिली ते तिसरी या गटात जि .प. प्राथमिक शाळा निमसागर शाळेचा इयत्ता दुसरीतील विद्यार्थी चि. शिवांश नवनाथ बंडगर याचा इंदापूर तालुक्यात प्रथम क्रमांक आला व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली .याबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्याबद्दल शालेय व्यवस्थापन समिती निमसाखर, निमसाखर केंद्राचे केंद्रप्रमुख श्री .बाळासाहेब नामदास तसेच मुख्याध्यापक श्री .विकास भुजबळ , सहशिक्षक श्री अनिल जाधव , सौ.मंजुश्री कवितके व मार्गदर्शक शिक्षक श्री. नवनाथ बंडगर यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आश्रम रोड परिसरातील घटना; अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

उरुळी कांचन : दैनिक संध्या

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील आश्रम रोड परिसरात बंद घराचे कुलूप उघडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे २ लाख २२ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. दिवसाढवळ्या झालेल्या या घरफोडीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किरण पोपट गोते (वय ३१, रा. आश्रम रोड, साई मेडिकलच्या पाठीमागे, उरुळी कांचन) हे २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० वाजण्याच्या दरम्यान आपले घर बंद करून बाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप उघडून घरात प्रवेश केला. घरातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून चोरटे पसार झाले. या घरफोडीत कानातील सोन्याचे टॉप व वेल (८ ग्रॅम) किंमत ८० हजार रुपये, कानातील सोन्याचे पेंडंट (५ ग्रॅम) किंमत ५० हजार रुपये, गळ्यातील सोन्याची चेन (३ ग्रॅम) किंमत ३० हजार रुपये, सोन्याचे गणपती पेंडंट (२ ग्रॅम) किंमत २० हजार रुपये, सोन्याचे जिरा मणी (३ ग्रॅम) किंमत ३० हजार रुपये, तसेच पायातील चांदीचे पैजण (४.५ तोळे) किंमत १२ हजार रुपये, असा एकूण २ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. या घटनेप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार सलीम शेख करीत आहेत.

महावितरणच्या कारभारावर ग्राहकांचा संताप; वीजबिल दुरुस्तीसाठी हेलपाटे



आळंदी : दैनिक संध्या

महावितरणच्या आळंदी विभागातील कारभाराविरोधात वीजग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. वीजबिलांमधील त्रुटी, वाढीव बिले आणि तक्रारींच्या निवारणासाठी कराव्या लागणाऱ्या वारंवार फेऱ्या यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या प्रश्नांवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड.सौरभ गव्हाणे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत कारभारात सुधारणा करण्याची मागणी केली. वीजबिल दुरुस्तीसाठी सोमवार आणि गुरुवार असे आठवड्यातील केवळ दोन दिवसच अधिकारी उपलब्ध असल्याने ग्राहकांची गैरसोय होत असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. अंदाजे मीटर रीडिंगच्या आधारे वाढीव बिले आकारली जात असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी मांडल्या. तसेच मीटर रीडिंग घेताना छायाचित्रे न काढणे, वीजबिलांचे योग्य प्रकारे वितरण न होणे आणि स्मार्ट मीटरमुळे उद्भवणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली. सर्वसामान्य नागरिकांना वीजबिल दुरुस्तीसारख्या साध्या कामासाठी वारंवार कार्यालयात यावे लागत असेल, तर महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होत असताना त्यांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण का होत नाही, असा सवाल ॲड.सौरभ गव्हाणे यांनी उपस्थित केला. ग्राहकांना दिलासा देण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करावी आणि वीजबिलांमधील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी नगरसेवक सागर कुऱ्हाडे यांच्यासह अनेक वीजग्राहक उपस्थित होते.

नऊ महिलांना नवदुर्गा पुरस्कार देवून सन्मान

जगताप प्रतिष्ठानचा उपक्रम



■ सासवड (दै. संध्या)

आयुष्य जगत असताना आलेल्या संकटावर मात करत जिद्दीने उभ्या राहणाऱ्या नऊ महिलांना नवदुर्गा पुरस्कार देऊन सासवड येथे झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.गेली पाच वर्षे सातत्याने हा उपक्रम राबवणाऱ्या स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने या कर्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील लक्ष्मी सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमास नेवासा येथील स्वामी समर्थ शुगर मिलच्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ ममता विजय शिवतारे -लांडे, सासवडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनावणे व पुणे येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे समीर जाधवराव प्रमुख अतिथी म्हणून हजर होते. पुरस्कारार्थी सर्व महिलांना शाल, सन्मानपत्र व शफी पठाण लिखित तुकाराम हे पुस्तक देऊन गौरवण्यात आले. डॉ वृषाली जगताप, सीमा साळवे, विजयमाला पवार, उज्वला बांदल, विद्या जाधव, पुजा गायकवाड, स्नेहा धुमाळ, कल्पना जगताप, व शालन कावडे यांना त्यांच्या संघर्ष कहाणीबद्दल नवदुर्गा पुरस्कार देण्यात आला. याचवेळी अमृता जगताप -ताकवले यांनी पीएचडी पदवी मिळाल्यामुळे व एकोणीस वर्षाखालील राष्ट्रीय क्रिकेट संघात निवड झालेल्या श्रेया धुमाळ यांचा देखील विशेष सन्मान करण्यात आला. डॉ वृषाली जगताप व विद्या जाधव यांनी सत्काराला उत्तर देत प्रतिष्ठानचे ऋण मानले. प्रमुख मनोगतात डॉ ममता शिवतारे यांनी अगदी अचूक व बारकाईने निरीक्षण करून प्रतिकूल परिस्थितीतुन पुढे आलेल्या महिलांच्या या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करत प्रतिष्ठानचे कौतुक तर पुरस्कारार्थी महिलांचे अभिनंदन केले. पुरुषांपेक्षा स्त्री वर निर्मितीची जबाबदारी अधिक आहे अशा परिस्थितीत समाजात वावरणाऱ्या महिलांचा कायम सन्मान झाला पाहिजे अशी भावना त्यांनी मांडली. वडिलांना किडनी दान करून आपण त्यांच्या ऋणातुन काही अंशी उतराई झालो असं सांगत ममता शिवतारे यांनी किडनी दान देणाऱ्यात आई किंवा बायकोच जास्त असते असे सांगितले. पोलीस अधिकारी वैभव सोनावणे यांनी तसेच समीर जाधवराव यांनीही सर्व सन्मानार्थी महिलांचे अभिनंदन करत प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे प्रेरणा मिळते असे संगितले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांनी प्रास्तविक केले. सचिव हेमंत ताकवले यांनी आभार प्रदर्शन तर उपाध्यक्ष भानुकाका जगताप यांनी मान्यवरांचे स्वागत केले. किशोरी पवार यांनी सन्मानपत्राचे वाचन केले आणि मोहिनी लोणकर यांनी उत्तम सूत्रसंचालन केले. डॉ दिपक जगताप, ॲड अण्णासाहेब खाडे, संजय काटकर, अंकुर शिवरकर, नगरसेविका शिल्पा जगताप व दिपाली जगताप, मिलिंद इनामके, अक्षरराज जगताप, राजु यादव रमेश कानडे, संजय जाधव, गिरीश जगताप, अनिता जाधव, मीरा कानडे, आकांक्षा साळवे, रमेश जाधव यांसह मोठ्या संख्येने नागरिक यावेळी उपस्थित होते.



महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी रोटरीचा पुढाकार

हाडांच्या तपासणीला प्रचंड प्रतिसाद

■ चाकण (दै. संध्या)

रोटरी क्लब ऑफ चाकण, रोटरी क्लब ऑफ चाकण एअरपोर्ट आणि श्रद्धा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबीराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मेनोपॉज व हाडांच्या आरोग्य तपासणी शिबिराचा दोनशे महिलांनी लाभ घेतला. या शिबिरात मेनोपॉजच्या काळातील शारीरिक बदल, हाडांचे आरोग्य, हाडांची घनता, वाढत्या वयानुसार हाडांची होणारी झीज आणि ऑस्टिओपोरोसिस यांविषयी तज्ज्ञांनी चौफेर मार्गदर्शन केले. सहभागींसाठी हाडांच्या घनतेची तपासणी, रक्त तपासणी तसेच आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. या कार्यक्रमाला रोटरीचे जिल्हा ३१३१ चे प्रांतपाल नितीन ढमाले, डॉ. निलम ढमाले, डॉ. रावसाहेब आवटे, डॉ. संपत केदारे, उद्योजक तुकाराम कांडगे आदी उपस्थित होते. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. लता त्रिंबके यांनी मेनोपॉजविषयी, तर अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुहास कांबळे यांनी हाडांचे आरोग्य याविषयी चौफेर मार्गदर्शन केले. डॉ. विद्या भोसले यांनी यावेळी बोलताना सांगितले की," महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. कोणताही आजार अंगावर सहन न करता त्याची वेळेवर तपासणी करून तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची आवश्यकता आहे." या उपक्रमासाठी श्रद्धा हॉस्पिटल, समृद्धी लॅब, मुंगसे लॅब आणि मोतीलाल सांकला यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले, सचिव डॉ. भरत राऊत यांनी सांगितले. चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले यांनी सांगितले की, " महिलांची आरोग्याविषयक जागरूकता वाढविणे व प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे, यासाठी आरोग्य शिबिरांची गरज असते. हा या आरोग्य शिबिराचा प्रमुख उद्देश होता. भविष्यकाळात असेच नवनवीन उपक्रम राबवून महिलांच्या आरोग्याला जास्तीत जास्त प्राधान्य दिले जाणार आहे." डॉ. प्रज्ञा भवारी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. भरत राऊत यांनी आभार मानले.

जिल्ह्यात रब्बी ज्वारी लागवडीला कृषी विभागाचे प्रोत्साहन

■ बारामती (दै. संध्या)

रब्बी हंगामातील ज्वारी पिकाचे क्षेत्र वाढवण्यासह शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण उप अभियानांतर्गत रब्बी ज्वारी सन २०२६- २७ योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यासाठी १५ हजार ८६० बियाणे मिनीकिट म्हणजेच ६३४ क्विंटल रब्बी ज्वारी बियाणांचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले आहे. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या तसेच दर्जेदार चारा उपलब्ध करून देणाऱ्या रब्बी ज्वारी पिकाला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सुधारित वाणांच्या बियाणांचा लाभ मिळणार असून प्रतिकूल परिस्थितीतही पीक उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे. रब्बी ज्वारी हे अन्नधान्याबरोबरच पशुधनासाठी दर्जेदार चारा उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे पीक आहे. कमी पाण्यात येणाऱ्या या पिकाच्या लागवडीला प्रोत्साहन मिळाल्यास शेतकऱ्यांचे संभाव्य आर्थिक नुकसान कमी करण्यास आणि शेतीची उत्पादकता वाढवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर त्वरित नोंदणी करुन या योजनेचा लाभ घ्यावा. उपलब्ध बियाणांचा योग्य वापर करावा आणि वेळेवर पेरणी करून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे. या योजनेसाठी लाभार्थी शेतकऱ्यांची निवड महाडीबीटी पोर्टल द्वारे प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार आहे त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी विलंब न करता पोर्टलवर ऑनलाईन अर्ज नोंदणी करावी. निवड झालेल्या पात्र शेतकऱ्यांना १० नोव्हेंबर २०२६ पूर्वी नियोजनबद्ध पद्धतीने बियाणे मिनीकिटचे वितरण करण्यात येणार आहे, असे कृषी विभागाने कळविले आहे.

किटमध्ये काय मिळणार ?

या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र शेतकऱ्याला एका मिनी किटमध्ये पुढील साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. परभणी सुपरमोती, फुले यशोमती, पीकेव्ही शक्ती या सुधारित वाणांचे ४ किलो ज्वारी बियाणे, पिकाच्या वाढीसाठी उपयुक्त जैविक खत, ज्वारी पिकाच्या योग्य लागवडीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जनावरांवरून वाद; वृद्ध दाम्पत्याचा धारदार शस्त्राने खून

■ सासवड (दै. संध्या)

जनावरे घरासमोरून नेण्यावरून काही दिवसांपूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून पानवडी (ता. पुरंदर) येथे वृद्ध दाम्पत्याची धारदार शस्त्राने हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. रत्नमाला मोहन धिवार (वय ७२) आणि मोहन बाबुराव धिवार (वय ८३) अशी मृतांची नावे आहेत. या प्रकरणी गणेश सुभाष धिवार (वय २७, रा. पानवडी) याच्याविरुद्ध सासवड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पानवडी गावात फिर्यादी अश्विनी अमर खरात (वय ३४) यांच्या घराजवळ आरोपी गणेश धिवार राहतो. काही दिवसांपूर्वी फिर्यादी यांच्या दारासमोरून गायी व बैल नेत असताना वाद झाला होता. या वादाचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी यांच्या आई रत्नमाला धिवार आणि वडील मोहन धिवार यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून त्यांची हत्या केल्याची तक्रार देण्यात आली आहे. पानवडी गावच्या हद्दीत २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.२० वाजण्यापूर्वी ही घटना घडल्याची नोंद पोलिसांनी केली आहे. या प्रकरणी २६ ऑक्टोबर रोजी पहाटे २.२९ वाजता सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) नुसार हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे पानवडी परिसरात खळबळ उडाली असून, किरकोळ वादातून दोन ज्येष्ठ नागरिकांचा जीव गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

कॅप्सूलमधून दिले ब्लेडचे तुकडे; संतापजनक घटना

■ पुणे (दै. संध्या)

पत्नीवरील चारित्र्याच्या संशयातून तिला कॅल्शिअमच्या गोळ्या असल्याचे भासवत कॅप्सूलमधून खाण्यासाठी ब्लेडचे तुकडे घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला न्यायालयाने सात वर्षे सक्तमजुरी आणि ७० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध गांधी यांनी हा निकाल दिला. सोमनाथ साधू सपकाळ (वय ४५, रा. शिवणे, पुणे) असे पतीचे नाव आहे. या प्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी फिर्याद देत सपकाळविरोधात नोव्हेंबर २०२३ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ऑक्टोबर २०२३ मध्ये पत्नीच्या पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. दोन वेळा शौचावाटे ब्लेडचे तुकडे बाहेर पडले. त्यानंतर ८ नोव्हेंबर रोजी त्रास वाढल्याने त्यांना रुग्णालयात



दाखल करण्यात आले. तपासणीत पोटात ब्लेडचा तुकडा आढळून आला. डॉक्टरांनी ११ नोव्हेंबर रोजी तो बाहेर काढला. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक करत न्यायालयात हजर केले. सरकारी वकील लीना पाठक यांनी काम पाहिले. त्यांनी सात साक्षीदार तपासले. खटल्याच्या सुनावणीदरम्यान पत्नीने पतीविरोधातील आरोप नाकारले. तसेच, त्यांच्यातील वाद मिटल्याचे सांगितले. मुलानेही वडिलांविरोधात साक्ष दिली नाही. मात्र, हा तुकडा प्राणघातक असून, त्यामुळे महिलेचा मृत्यू होऊ शकला असता, अशी साक्ष डॉक्टरांनी दिली. तसेच, डॉक्टरांची साक्ष आणि तपासादरम्यान मिळालेले इतर पुरावे आरोपीविरोधातील गुन्हा सिद्ध करण्यास पुरेसे आहेत. आरोपीने पत्नीवर दबाव आणल्यामुळे तिने न्यायालयात आपली साक्ष बदलली असण्याची शक्यता आहे. केवळ साक्षीदार फितूर झाला म्हणून त्याची संपूर्ण साक्ष नाकारता येत नाही. त्यामुळे उपलब्ध पुराव्यांचा विचार करून आरोपीला दोषी ठरवून शिक्षा सुनावण्यात यावी, असा युक्तिवाद ॲड. पाठक यांनी केला. दरम्यान, आरोपी हा कुटुंबात एकमेव कमावता व कर्ता असून, त्याची पत्नी आणि मुलगा त्याच्यासोबत राहतात. त्याच्यावर त्याचे संपूर्ण कुटुंब अवलंबून आहे.

कुंभमेळा रद्द करा, ३५ हजार कोटी शेतकऱ्यांना द्या!

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचा राज्य सरकारला इशारा

■ पुणे (दै. संध्या)

राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, शेतकरी व सामान्यांचे हाल आणि सरकारकडून उधळपट्टी सुरू असून, कुंभमेळा रद्द करून ३५ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना द्या, पिकांसाठी 'सिबिल'ची अट रद्द करा आणि तातडीने १ लाख रुपयांची सरसकट कर्जमुक्ती करा," अशी शेतकरी संघटनेचे नेते रवीकांत तुपकर यांनी केली. सरकारने तातडीने पावले उचलली नाहीत, तर येत्या नोव्हेंबरपासून राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल, असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला.

ते पुण्यात सोमवारी पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, "२०२५ नंतरच्या दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचे १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सरसकट माफ करावे.

रिझर्व्ह बँकेला सांगून पीककर्जासाठी असलेली 'सिबिल'ची जाचक अट ताबडतोब हटवावी. शेतकऱ्यांना १ लाख हेक्टर मदत द्यावी आणि भूमिहीन शेतकऱ्यांनाही आर्थिक साहाय्य करावे. एकमेकांना खायला उठेल अशी गंभीर परिस्थिती खेड्यापाड्यांमध्ये निर्माण झाली आहे. दुष्काळ पडला असताना




व्हीआयपींसाठी साडेबारा कोटी रुपयांच्या गाड्या खरेदी केल्या जात आहेत. नैतिकतेची चाड उरली आहे की नाही? हा पैसा एखाद्या तालुक्याचा चारा किंवा जनावरांच्या पाण्याच्या टँकरसाठी वापरता आला असता." १६ लाख कोटींचे उद्योगपतींचे कर्ज माफ करणारे सरकार शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सरकारकडून देण्यात येणाऱ्या ५ हजार रुपयांच्या मदतीवर ताशेरे ओढत तुपकर म्हणाले, "अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी सरकारची ही ५ हजार रुपयांची भीक परत पाठवली आहे. सरकारला आमचे आव्हान आहे की, एका मंत्र्याने ५ हजार रुपयांत दिवाळी करून दाखवावी आणि पुढचे चार महिने काढून दाखवावेत." अधिवेशनावर होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चावर ताशेरे ओढत त्यांनी मागणी केली की, अधिवेशन घ्यायचेच असेल तर ते मुंबई किंवा नागपूरमध्ये न घेता दुष्काळी भागातील खुल्या मैदानावर शेतकऱ्यांच्या बांधावर घ्यावे आणि मंत्र्यांना तिथे झोपू द्यावे, म्हणजे त्यांना वास्तव कळेल. आमदारांना मिळणारा विकास निधी आणि आमदार, प्रधान सचिव तसेच जिल्हाधिकाऱ्यांचे तीन वर्षांचे पगार बंद करावेत, अशी मागणी त्यांनी केली.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



थोडक्यात पण महत्वाचे

संख्याज्ञान मूल्यमापन चाचणीत सुमारे सात लाख परीक्षार्थी सहभागी

मुंबई : केंद्र पुरस्कृत 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत राज्यभरात पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (एफएलएनएटी) यशस्वीरीत्या घेण्यात आली. या परीक्षेत सुमारे सात लाख परीक्षार्थी सहभागी झाले असून, उत्तीर्ण होणाऱ्या नवसाक्षरांना केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून प्रमाणपत्र आणि गुणपत्रक देण्यात येणार आहे. तसेच त्यांना पुढील शिक्षणासाठी इयत्ता तिसरी, पाचवी, आठवी, दहावी आणि बारावीच्या परीक्षांना बसता येणार असल्याची माहिती शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी दिली आहे. असाक्षर व्यक्तींना साक्षर करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. उल्लास ॲपवर नोंदणी झालेल्या परीक्षार्थ्यांसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांतील यू-डायस प्राप्त शाळांमध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती, कन्नड, तेलुगू, तमिळ आणि बंगाली अशा नऊ माध्यमांतून ही परीक्षा घेण्यात आली. या चाचणीमुळे आर्थिक व कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्यविषयक जागरूकता, बालसंगोपन, शिक्षण आणि कुटुंबकल्याणाशी संबंधित जीवनकौशल्ये विकसित होण्यास मदत होणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रधान सचिव रणजीत सिंह देओल आणि आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली असाक्षरांना साक्षर बनविण्यासाठी राज्यात 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या नवसाक्षरांच्या आज झालेल्या परीक्षेदरम्यान जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह केंद्र व राज्य शासनाच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी विविध परीक्षा केंद्रांना भेटी देऊन परीक्षेच्या कामकाजाची पाहणी केली. जिल्हास्तरीय अधिकारी, शिक्षणाधिकारी, प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुखांनीही परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. शिक्षक संघटना, शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी परीक्षेचे नियोजन करून ही प्रक्रिया पूर्ण केली.

तरुणांनी अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनावे : वर्मा

मुंबई : अमली पदार्थांचे व्यसन ही समाजापुढील, विशेषतः तरुण पिढीसमोरील गंभीर समस्या आहे. अमली पदार्थांचा पुरवठा रोखण्याबरोबरच त्यांची मागणी कमी करण्यासाठी जनजागृती, प्रतिबंध, पुनर्वसन आणि व्यसनाधीन व्यक्तींना आधार देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनून जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसनावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'नशामुक्त भारत – फाईट अगेन्स्ट ड्रग्ज' या राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीच्या शुभारंभप्रसंगी राज्यपाल बोलत होते. नरीमन पॉईंट येथे झालेल्या या कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आणि राज्य राखीव पोलीस बलाचे अपर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर यांच्यासह विविध राज्यांतील पोलीस अधिकारी,कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मोटारसायकल रॅलीला गुजरातकडे प्रस्थान देण्यात आले. विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील पोलीस दलांचे प्रतिनिधी तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी व जवान या रॅलीत सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याबरोबरच तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे हा या रॅलीचा उद्देश आहे. ही रॅली गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे पोहोचणार आहे. राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांनी विविध संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण घडवून आणण्यात ऐतिहासिक आणि निर्णायक भूमिका बजावली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे सशक्त आणि एकसंध भारताचा पाया घातला गेला. राष्ट्रीय एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी आपण सदैव सतर्क राहिले पाहिजे.

दुष्काळग्रस्त भागात पाणीटंचाई होणार नाही, याचे नियोजन करा

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे निर्देश, तालुकास्तरीय समित्यांनी तातडीने अहवाल सादर करावेत

■ भंडारा(दै. संध्या)

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होईल, असे नियोजन करावे. दुष्काळ निवारणासाठी गठित केलेल्या तालुकास्तरीय समित्यांचे अध्यक्ष तहसीलदार असून, या समित्यांनी लोकप्रतिनिधींशी चर्चा करून बैठकीत समितीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावेत. जेणेकरून दुष्काळ व पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी अचूक आराखडे राज्य शासनास सादर करता येतील, असे निर्देश पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत दिले.

दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्यासह खासगी शाळांमध्येही शासनाच्या नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी. शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व उपाययोजनांची संबंधित यंत्रणांनी प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सूचित केले. यावेळी खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार सर्वश्री परिणय फुके, नरेंद्र भोंडेकर, अविनाश ब्राह्मणकर, राजू कारेमोरे, राजेंद्र जैन (ऑनलाइन पद्धतीने), नगराध्यक्ष मधुरा मदनकर, जिल्हाधिकारी सावन कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद कुमार साळवे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



दुष्काळ निवारणासाठी २९ व ३० ऑक्टोबर रोजी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत तालुकास्तरीय समित्यांच्या बैठका घेऊन आवश्यक प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडे तातडीने सादर करण्याचे निर्देश डॉ. भोयर यांनी दिले. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पीक कर्जांचे पुनर्गठन करावे, कोणत्याही प्रकारची कर्जवसुली करू नये, अखंडित वीजपुरवठा आणि अन्नधान्याची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यातील तलावांचे खोलीकरण व गाळ काढण्याच्या कामांचे प्रस्ताव पुढील आठ दिवसांत शासनाकडे सादर करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांना दिले. नगरपालिका क्षेत्रातील विहिरी व बोअरवेल तसेच ग्रामीण भागातील शासकीय विहिरींची सद्यस्थिती आणि पाण्याची उपलब्धता यांची माहिती संकलित करून पाणीटंचाई निवारणाचे नियोजन तातडीने करावे व अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना द्यावा. ग्रामीण व शहरी भागातील पाणीटंचाईचा विचार करून तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समित्यांच्या बैठका घ्याव्यात. शासन निर्णयातील सर्व तरतुदींची अंमलबजावणी करून दुष्काळग्रस्त नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. यावेळी उपस्थित सर्व लोकप्रतिनिधींनी टंचाई निवारणासाठी उपाययोजना सुचवल्या व चर्चेतही सहभाग घेतला.

प्रकल्पाला सहकार्य करताना महाराष्ट्राच्या हिताच्या रक्षणाला प्राधान्य

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : जलसंपदा प्रकल्पाच्या परिणामांच्या स्वतंत्र अभ्यासासाठी संयुक्त समिती

■ मुंबई (दै. संध्या)


तेलंगणा राज्यातील थुमिडीहेट्टी जलसंपदा प्रकल्पाची उंची वाढविण्याबाबत मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांच्या विनंतीनुसार या प्रकल्पविषयक मुद्द्यांचा महाराष्ट्र स्वतंत्र अभ्यास करेल. यासाठी दोन्ही राज्यांचे मुख्य सचिव आणि जलसंपदा विभागांचे सचिव यांची संयुक्त समिती नेमून तांत्रिक मुद्दे आणि महाराष्ट्रातील संभाव्य बुडीत क्षेत्र यांचा अभ्यास केला जाईल. त्यानुसार महाराष्ट्रातील नागरिकांच्या हिताचे रक्षण करत तेलंगणाला सहकार्य करण्याची सकारात्मक भूमिका घेतली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.तेलंगणा चे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांच्यासह शिष्टमंडळासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी



तसेच जलसंपदा मंत्री उत्तमकुमार रेड्डी यांनी थुमिडीहेट्टी प्रकल्पाविषयी माहिती देऊन प्रकल्पाची उंची १४८ वरून १५२ मीटरपर्यंत वाढविण्यासाठी महाराष्ट्राने मान्यता द्यावी, अशी विनंती केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेजारी राज्यांचे प्रश्न परस्पर सहकार्याने सोडविण्याची भूमिका महाराष्ट्राने नेहमीच घेतली आहे. महाराष्ट्रातील नागरिकांचे नुकसान होत नसेल आणि अन्य राज्याला लाभ होत असेल, तर सकारात्मक निर्णय घेण्यास राज्याची हरकत नाही. यापूर्वीही महाराष्ट्राने तेलंगणाच्या प्रस्तावाबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. पूर्वीच्या मान्यतेनंतर प्रकल्पाचे प्रत्यक्ष बुडीत क्षेत्र अपेक्षित क्षेत्राच्या तुलनेत वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नव्या प्रस्तावामुळे होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रकल्पस्थळ बदलल्यामुळे बुडीत क्षेत्रावर होणारा परिणाम, संबंधित अभयारण्याचा समावेश आणि नदीपात्राबाहेरील आवश्यक जमिनीचे क्षेत्र यांचा अभ्यास केला जाईल. महाराष्ट्राच्या अभ्यासावर तेलंगणाला काही आक्षेप किंवा त्रुटी जाणवल्यास दोन्ही राज्यांचे अधिकारी त्यावर चर्चा करतील. आवश्यकता भासल्यास तज्ज्ञांचे मतही घेतले जाईल. पाणी वाटप आणि वैधानिक मंजुरीशी संबंधित बाबी केंद्रीय जल आयोगाच्या कार्यक्षेत्रात येतात. आयोगाने राज्याचा अभिप्राय मागितल्यानंतर महाराष्ट्र तथ्यांच्या आधारे आपली भूमिका मांडेल.



अलॉइस, राजकुमारी सोफी आणि शिष्टमंडळाचे प्रयाण

■ मुंबई (दै. संध्या)

लिंकटेनस्टाईनचे राजकुमार अलॉइस आणि राजकुमारी सोफी आणि त्यांच्या शिष्टमंडळाचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून प्रयाण झाले. याप्रसंगी कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख, राजशिष्टाचार विभागाच्या सहसचिव रोहिणी जाधव, मुंबई उपनगरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद्माकर रोकडे उपस्थित होते.

शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने काम करा

■ मुंबई(दै. संध्या)

शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता राखून योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यावर भर द्यावा,असे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले.

पुणे यशदा येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निवासी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री श्री. सावे बोलत होते. यावेळी भटके-विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्राचे अध्यक्ष उद्धवराव काळे, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज, 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे, राज्यस्तरीय अशासकीय सदस्य राजेंद्र दोनाडकर, डॉ. संजय पुरी, नरेश पोटे, शरद माकर यांची प्रमुख उपस्थिती होती.इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अशासकीय सदस्य, विभागाचे क्षेत्रीय अधिकारी आणि महसूल विभागाचे क्षेत्रीय अधिकारी यांचे २४ व २५ ऑक्टोबरदरम्यान हे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजे उमाजी नाईक आणि वसंतराव नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

मंत्री श्री. सावे म्हणाले की, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे.

एकनाथ शिंदेंनी कुंभमेळ्यासाठी साधला संत-महंतांशी संवाद

■ नाशिक (दै. संध्या)

राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ आहे. संतांच्या पायाशी नतमस्तक होऊन राज्यकारभार चालवणे हाच आमचा संस्कार आहे. भगवान त्र्यंबकेश्वर आणि गोदामाईच्या चरणी वंदन करून देशभरातून आलेल्या संत-महंतांची सेवा करण्याची संधी आम्हाला मिळणे हे आमचे परमभाग्य असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संत संमेलनाला उपस्थित राहून कुंभमेळ्यासाठी देशभरातून आलेल्या संत-महंतांशी संवाद साधला. साधू-संत येती घरा तोची दिवाळी दसरा. संतांच्या माध्यमातून खरी दिवाळी साजरी होत आहे. हे केवळ राजकीय किंवा सामाजिक संमेलन नसून आध्यात्मिक ऊर्जेचा उत्सव आहे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि वंदनीय गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांनी राजकारण हे समाजकारण, राष्ट्रसेवा आणि



राष्ट्ररक्षणासाठी करण्याचा संस्कार दिला. राजसत्ता हातात असली तरी आध्यात्मिक व धर्मसत्ता मोठी आहे. कुंभाच्या कामांमुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांना पक्की घरे देऊन पुनर्वसन केले जाईल; कुणावरही अन्याय होणार नाही. व्यापारी, दुकानदार आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास सरकार मोबदला देईल. साधुग्रामच्या भूसंपादनासंदर्भातील तक्रारीही सोडवल्या जातील. त्र्यंबकेश्वर स्टेडियमसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू असून निधीचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासकीय भवनासाठी आवश्यक निधी दिला जाईल असे यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नासाठी शिवसेना मदत करणार असल्याची घोषणा यावेळी केली. यासोबतच सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या १३ आखाड्यांतील संत-महंत आणि साधूंच्या भोजनाची व्यवस्था शिवसेनेच्या वतीने केली जाईल असेही याप्रसंगी जाहीर केले.

प्रत्येक घरावर भगवा ध्वज फडकवून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या स्वागतासाठी सज्ज व्हा : महाजन



■ नाशिक (दै. संध्या)

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा. कुंभमेळा हा केवळ प्रशासनाचा किंवा लोकप्रतिनिधींचा कार्यक्रम नसून संपूर्ण नाशिककरांचा उत्सव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रत्येक घरावर भगवा ध्वज लावून कुंभमेळ्याच्या स्वागतासाठी नागरिकांनी सज्ज व्हावे, असे आवाहन राज्याचे जलसंपदा तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी केले.

३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सिंहस्थ महाकुंभमेळा ध्वजारोहण सोहळ्याच्या तयारीच्या अनुषंगाने आज पालकमंत्री महाजन यांनी त्यांच्या निवासस्थानी भगवा ध्वज फडकवून या अभियानास प्रारंभ केला. यावेळी नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.


पालकमंत्री महाजन म्हणाले की, या सोहळ्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या औपचारिक प्रारंभाची नांदी होणार असून, त्यासाठी संपूर्ण नाशिक जिल्ह्यात लोकसहभागातून वातावरणनिर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे. मागील कुंभमेळ्यात सुमारे तीन ते सव्वातीन कोटी भाविक सहभागी झाले होते. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात भाविकांची संख्या सुमारे १२ कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज असल्याने गर्दीचे व्यवस्थापन, भाविकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था आणि स्नानघाटावरील नियोजन यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील भौगोलिक परिस्थिती तसेच उपलब्ध जागेच्या मर्यादा लक्षात घेऊन सर्व यंत्रणांनी समन्वयाने आणि गांभीर्याने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

कुंभमेळा हा श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. या सोहळ्यासाठी भाविकांना स्वतंत्र निमंत्रण देण्याची आवश्यकता नसते. देशभरातून भाविक स्वयंस्फूर्तीने या धार्मिक पर्वात सहभागी होतात. त्यामुळे कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासकीय तयारीसोबतच नागरिकांचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक घरावर भगवा ध्वज फडकला पाहिजे आणि संपूर्ण नाशिक शहर भगव्या ध्वजांनी सजलेले दिसले पाहिजे. यासाठी संबंधितांनी आपापल्या परिसरात घरोघरी संपर्क साधून नागरिकांना या उपक्रमात सहभागी करून घ्यावे. ध्वज लावण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून, नागरिकांच्या सहकार्याने हे अभियान व्यापक स्वरूपात राबवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कुंभमेळा हा प्रत्येक नाशिककरांचा उत्सव असल्याची भावना नागरिकांच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या गावासाठी आणि शहरासाठी जबाबदारी स्वीकारून या उपक्रमात योगदान दिल्यास संपूर्ण देशात नाशिकच्या सांस्कृतिक परंपरेचा आणि लोकसहभागाचा सकारात्मक संदेश जाईल, असा विश्वास पालकमंत्री महाजन यांनी व्यक्त केला. ३१ ऑक्टोबरच्या ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित विविध कार्यक्रमांसह या उपक्रमातही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. आगामी सिंहस्थ कुंभमेळा भव्य, सुरक्षित आणि सुव्यवस्थित पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमातही पालकमंत्री महाजन, उपस्थित मान्यवर आणि नागरिकांनी सहभाग नोंदविला.




दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६



www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

थोडक्यात पण महत्वाचे



मतपेट्यांवरील लिफाफ्यांवर प्रिसायडिंग ऑफिसरची स्वाक्षरी नसल्याचा आरोप


पुणे : दैनिक संध्या

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक प्रक्रियेत काही मतपेट्यांवरील लिफाफ्यांवर प्रिसायडिंग ऑफिसर यांची स्वाक्षरी नसल्याचा आरोप पुणे पदवीधरचे उमेदवार प्रा. आनंद जेठे आणि पुणे शिक्षक च्या उमेदवार प्रा. दिपाली सूर्यवंशी जेठे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी २४ ऑक्टोबर २०२६ रोजी माननीय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, पुण्यातील बॅडमिंटन हॉल, बालेवाडी स्टेडियम येथील स्ट्रॉंग रूममधील मतपेट्यांचे निरीक्षण करताना काही मतपेट्यांवरील लिफाफ्यांवर प्रिसायडिंग ऑफिसर यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता, विश्वासार्हता आणि नियमबद्धता कायम राखण्यासाठी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दोन्ही उमेदवारांनी केली आहे. तक्रारीनुसार, संबंधित मतपेट्यांवरील लिफाफ्यांची नियमानुसार तपासणी करून स्वाक्षरीसंदर्भातील बाब स्पष्ट करण्यात यावी. स्वाक्षरी नसल्याची बाब निश्चित झाल्यास, लागू निवडणूक नियमांनुसार योग्य ती कार्यवाही करावी आणि आवश्यकतेनुसार संबंधित ठिकाणी फेरनिवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातील केंद्र क्रमांक ३५१ ते ३५७, ४४१, ४४२, ४६१, ४६२ आणि ४६९, तसेच पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील केंद्र क्रमांक १२१, १७१ ते १७५ आणि २५५ यांचा तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत कोणताही संभ्रम राहू नये आणि संबंधित बाबींची नियमांनुसार पडताळणी व्हावी, यासाठी निवडणूक प्रशासनाने या तक्रारीची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी भूमिका प्रा. आनंद जेठे आणि प्रा. दिपाली सूर्यवंशी जेठे यांनी मांडली आहे. या तक्रारीवर निवडणूक प्रशासन काय भूमिका घेते आणि चौकशीत काय निष्पन्न होते, याकडे आता लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात रब्बी ज्वारी लागवडीला कृषी विभागाचे प्रोत्साहन

पुणे : दैनिक संध्या

रब्बी हंगामातील ज्वारी पिकाचे क्षेत्र वाढवण्यासह शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण उप अभियानांतर्गत रब्बी ज्वारी सन २०२६- २७ योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यासाठी १५ हजार ८६० बियाणे मिनीकिट म्हणजेच ६३४ क्विंटल रब्बी ज्वारी बियाणांचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले आहे. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे. कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या तसेच दर्जेदार चारा उपलब्ध करून देणाऱ्या रब्बी ज्वारी पिकाला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सुधारित वाणांच्या बियाणांचा लाभ मिळणार असून प्रतिकूल परिस्थितीतही पीक उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे. रब्बी ज्वारी हे अन्नधान्याबरोबरच पशुधनासाठी दर्जेदार चारा उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे पीक आहे. कमी पाण्यात येणाऱ्या या पिकाच्या लागवडीला प्रोत्साहन मिळाल्यास शेतकऱ्यांचे संभाव्य आर्थिक नुकसान कमी करण्यास आणि शेतीची उत्पादकता वाढवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर त्वरित नोंदणी करुन या योजनेचा लाभ घ्यावा. उपलब्ध बियाणांचा योग्य वापर करावा आणि वेळेवर पेरणी करून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र शेतकऱ्याला एका मिनी किटमध्ये पुढील साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. परभणी सुपरमोती, फुले यशोमती, पीकेव्ही शक्ती या सुधारित वाणांचे ४ किलो ज्वारी बियाणे, पिकाच्या वाढीसाठी उपयुक्त जैविक खत, ज्वारी पिकाच्या योग्य लागवडीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या योजनेसाठी लाभार्थी शेतकऱ्यांची निवड महाडीबीटी पोर्टल द्वारे प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार आहे त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी विलंब न करता पोर्टलवर ऑनलाईन अर्ज नोंदणी करावी. निवड झालेल्या पात्र शेतकऱ्यांना १० नोव्हेंबर २०२६ पूर्वी नियोजनबद्ध पद्धतीने बियाणे मिनीकिटचे वितरण करण्यात येणार आहे, असे कृषी विभागाने कळविले आहे.



नागठाणे परिसरात बिबट्याचा वावर

नागठाणे : दैनिक संध्या

नागठाणे, ता. सातारा येथील हिराई गोल्डन सिटी या रहिवासी परिसरात शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास बिबट्या दिसून आला. काही नागरिकांनी बिबट्याचे मोबाईलमध्ये छायाचित्र टिपले असून, परिसरातील काही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येही त्याचा वावर कैद झाला आहे. गेल्या दोन दिवसांत या परिसरातील तीन ते चार कुत्र्यांचा बिबट्याने फडशा पाडल्याची माहिती येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत चव्हाण यांनी दिली. लोकवस्तीत बिबट्याचा वावर आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही नागरिकांना धोकादायक वाटू लागले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करुन बिबट्याच्या वावराचा बंदोबस्त करावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून होत आहे.

जलव्यवस्थापन, शाश्वत नागरी विकास आणि कौशल्य विकासासाठी पुणे–फिनलंड सहकार्याला चालना!

महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकारातून पुणे शहराच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधींचा शोध

■ पुणे(दै. संध्या)

शहराचा शाश्वत विकास, नागरिकांचे जीवनमान उंचावणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि पर्यावरणपूरक नागरी सुविधा विकसित करण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेने आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. फिनलंडच्या वाणिज्यदूत सौ. पेट्रा थेमन यांनी पुणे महानगरपालिकेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसमवेत सदिच्छा भेट घेतली. यावेळी पुण्याच्या महापौर सौ. मंजुषा नागपुरे, महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम (भा.प्र.से.), अतिरिक्त महापालिका आयुक्त सौ. पवनीत कौर (भा. प्र.से.), अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री. ओमप्रकाश दिवटे यांच्यासह विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पुणे येथील जे. डब्ल्यू. मॅरियट हॉटेलमध्ये झालेल्या या बैठकीत जलव्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर, शाश्वत नागरी विकास, कौशल्य विकास आणि उद्योग क्षेत्रातील परस्पर सहकार्याच्या विविध शक्यतांवर चर्चा करण्यात आली.

नागरिकांचे समाधान आणि आनंद हेच शहरी विकासाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांनी यावेळी स्पष्ट केले. पाणी संवर्धन, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर, पर्यावरणाचे संरक्षण आणि नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. फिनलंडमधील प्रगत तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण संकल्पना आणि प्रभावी कार्यपद्धतींचा अभ्यास करून त्यांचा पुणे शहराच्या विकासासाठी उपयोग करून घेण्याची भूमिका त्यांनी मांडली. यासाठी फिनलंडमधील जलव्यवस्थापनाच्या यशस्वी प्रयोगांचा अभ्यास करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या संभाव्य अभ्यासभेटी आयोजित करण्याबाबतही त्यांनी स्वारस्य व्यक्त केले.



यावेळी महापौर सौ. मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "पुणे शहरातील नागरिकही आनंदी, समाधानी आणि सुरक्षित असावेत, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी फिनलंडमध्ये वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि उत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करून पुणे शहरात त्यांचा योग्य प्रकारे अवलंब करण्याचा आमचा प्रयत्न राहील."

फिनलंडच्या वाणिज्यदूत पेट्रा थेमन यांनी पुणे शहरातील हरित क्षेत्रे, औद्योगिक क्षमता आणि नागरी विकासाच्या संधींचे कौतुक केले. अभियांत्रिकी, डिजिटल तंत्रज्ञान आणि औद्योगिक उपाययोजनांमध्ये फिनलंडकडे असलेल्या प्रगत कौशल्याचा पुण्याच्या विकासासाठी उपयोग होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले. उद्योगांच्या गरजांनुसार कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे, प्रशिक्षित मनुष्यबळ टिकवून ठेवणे आणि भारत-फिनलंड आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी संवाद वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, महापौरांनी नागरिकांच्या आनंदाला दिलेल्या प्राधान्याचे कौतुक करत पुणे महानगरपालिकेसोबत परस्पर सहकार्याच्या संधी विकसित करण्याची तयारी दर्शविली.

महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम यांनी पुणे शहराचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, औद्योगिक सामर्थ्य आणि वेगाने होणारा नागरी विस्तार यांची माहिती दिली. जलव्यवस्थापन आणि सांडपाणी प्रक्रिया या क्षेत्रांत फिनलंडच्या अनुभवातून शिकण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. तसेच, पुणे शहरात 'ड्रिंक फ्रॉम टॅप' उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रगत तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करण्याबाबत त्यांनी स्वारस्य व्यक्त केले.

अतिरिक्त महापालिका आयुक्त सौ. पवनीत कौर यांनी पुणे शहरातील गुंतवणुकीच्या संधी, उद्योगांसाठी उपलब्ध असलेली एकखिडकी मंजुरी व्यवस्था आणि पायाभूत सुविधांची माहिती दिली. पुणे महानगरपालिकेच्या 'लाइटहाऊस' कौशल्य विकास केंद्रांमार्फत युवकांना उद्योगाभिमुख कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या केंद्रांच्या माध्यमातून फिनलंडमधील उद्योग आणि पुण्यातील प्रशिक्षित युवक यांच्यात समन्वय साधण्याच्या संधींबाबतही चर्चा झाली. यावेळी वाणिज्यदूत सौ. पेट्रा थेमन यांनी भविष्यात लाइटहाऊस कौशल्य विकास केंद्राला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री. ओमप्रकाश दिवटे यांनी पुणे शहरातील जमीन वापराचे नियोजन, नागरी विकासातील आव्हाने आणि वाढत्या पायाभूत सुविधांच्या गरजांमुळे वृक्षारोपणासाठी उपलब्ध होणाऱ्या मर्यादित जागेबाबत माहिती दिली. तसेच, फिनलंडमधील कंपन्यांना पुणे महानगरपालिकेच्या युवक कौशल्य विकास उपक्रमांशी जोडून उद्योगांच्या गरजांनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या संधींवर त्यांनी भर दिला.या बैठकीत पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर, शाश्वत नागरी नियोजन, कौशल्य विकास आणि औद्योगिक क्षेत्रातील सहकार्य या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. दोन्ही बाजूंनी परस्पर संवाद अधिक दृढ करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे आणि पुणे शहराच्या विकासासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सहकार्याच्या संधी विकसित करणे याबाबत अनुकूल भूमिका व्यक्त करण्यात आली. महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे शहराच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक उपाययोजना आणि आंतरराष्ट्रीय अनुभवांचा प्रभावी उपयोग करण्याच्या दिशेने हा संवाद महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नागरिकांचे जीवनमान उंचावणे, पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आणि युवकांसाठी कौशल्य विकासाच्या नव्या संधी निर्माण करणे, या उद्दिष्टांना या सहकार्यामुळे बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

टाकळी हाजीतील साबळेवाडीत जागेच्या वादातून मारहाण; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या बेट भागातील टाकळी हाजी च्या साबळेवाडी येथील बापुसाहेब नगर परिसरात जागेच्या वादातून एका व्यक्तीला शिवीगाळ व दमदाटी करून काठी आणि दगडाने मारहाण केल्याची घटना २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. याप्रकरणी सहा जणांविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत विलास गिरीधर चव्हाण (वय ३६, व्यवसाय चालक, रा. साबळेवाडी, बापुसाहेब नगर, टाकळी हाजी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, विलास चव्हाण हे घरासमोरील ओट्यावर उभे असताना त्यांच्या नातेवाइकांनी तेथे येऊन, 'तू आमच्या जागेत राहायचे नाही,' असे म्हणत शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर अशोक पोपट चव्हाण याने काठीने पाठीवर मारहाण केली, तर दत्तात्रय परशुराम चव्हाण याने डावा हात पिरगळला. विक्रम राघू चव्हाण याने दगड फेकून डोक्याच्या मागील बाजूस मारल्याने विलास चव्हाण खाली पडले, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.तसेच फुलाबाई राघू चव्हाण आणि मंगल परशुराम चव्हाण यांनी खाली पडलेल्या विलास चव्हाण यांना मारहाण केल्याचे, तर भिवाजी पांडुरंग चव्हाण हा काठी घेऊन अंगावर धावून आल्याचे फिर्यादी त नमूद आहे. यावेळी अशोक चव्हाण याने विलास चव्हाण यांच्या पत्नीला पतीला जिवंत सोडणार नसल्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. घटनेनंतर विलास चव्हाण यांना त्यांचा पुतण्या गोरख किसन चव्हाण याने मदत करून टाकळी हाजी पोलीस चौकीत नेले. उपचार घेतल्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दिली.या प्रकरणी विक्रम राघू चव्हाण, अशोक पोपट चव्हाण, दत्तात्रय परशुराम चव्हाण, भिवाजी पांडुरंग चव्हाण, फुलाबाई राघू चव्हाण आणि मंगल परशुराम चव्हाण (सर्व रा. साबळेवाडी, बापुसाहेब नगर, टाकळी हाजी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० आणि ११५(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार वायाळ करीत आहेत.

महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त मेहतर वाल्मिकी महासंघाच्यावतीने विनम्र अभिवादन



■ पुणे (दै. संध्या)

संस्कृत साहित्याचे आद्यकवी आणि पवित्र महाकाव्य रामायणचे रचनाकार महर्षी वाल्मिकी यांची जयंती निमित्त. पुणे जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुणे शहर मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने महासचिव नरेश जाधव आणि माजी नगरसेवक सुधीर जानजोत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले होते.

यावेळी कामगार नेते राजन चंडालिया, स्वीकृत नगरसेवक विनोद निनारीया, महेंद्र लालबीगे, शैलेंद्र चव्हाण, जगदीश चव्हाण, राजेंद्र चंडालिया आदी उपस्थित होते.

महेश सूर्यवंशी यांची निवड झाल्याबद्दल लायंन्स क्लब ऑफ पुणे तर्फे सत्कार

■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपतीच्या ट्रस्टच्या अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी यांची निवड झाल्याबद्दल लायंन्स क्लब ऑफ पुणे अग्रेसन डायनेस्टिक सेंटर. अनूर्वी फाउंडेशन तर्फे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लायंन्सचे माजी प्रांतपाल राजेश अग्रवाल, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रवी अग्रवाल, आणि कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. लायंन्स क्लब तर्फे चालविण्यात येणाऱ्या अनेक समाज उपयोगी सेवा कार्यात दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट तर्फे सहकार्य मिळत असतो. या पुढेही रेन वॉटर हार्वेस्टिंग, डायग्नोस्टिक



सेंटर, मेडिकल कॅम्प असे अनेक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी चर्चा झाली.

पुणे पदवीधर-शिक्षक मतदारसंघाच्या मतदानानंतर भाजप नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी घेतला विसावा!

■ पिंपरी-चिंचवड(दै. संध्या)

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गेल्या १२ ते १३ दिवसांपासून धावपळ करणाऱ्या कार्यकर्त्यांनी मतदान प्रक्रिया संपल्यानंतर चिंचवड येथील फत्तेचंद जैन हायस्कूलजवळील बूथ परिसरात विसावा घेतला.

पुणे विभाग पदवीधर शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचे पिंपरी विभागातील मतदान केंद्र हे चिंचवड येथील फत्तेचंद जैन हायस्कूल मध्ये होते, सर्व मतदारांना मतदान करावे असे आवाहन



केले.त भारतीय जनता पार्टीचे पदवीधर उमेदवार सौ. स्मिताताई जाधव व शिक्षक चे उमेदवार श्री कौस्तुभ गावडे सर यांचे प्रचारार्थ गेली 12,13 दिवस धावपळ केली त्यानंतर आज दिनांक 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान 4.00 वाजता मतदान प्रक्रिया थांबली त्या वेळी सर्व कार्यकर्त्यांनी शाळेजवळील बूथ जवळ विसावा घेतला.

या वेळी कामगार नेते यशवंतभाऊ भोसले समवेत आमदार श्री अमितजी गोरखे, आमदार सौ उमाताई खापरे ,श्री सदाशिवराव खाडे सर, मा. उप महापौर तुषारजी हिंगे,मा.नगरसेवक श्री राजू दुर्गे, नगरसेवक अमितजी गावडे, नगरसेवक कैलासजी कुटे, नगरसेवक कुशाग्रजी कदम, मा नगरसेवक नामदेव ढाके,माऊली सूर्यवंशी, मंडल अध्यक्ष मंगेशजी धाडगे,इत्यादी मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.


'रामायणम्'च्या 'मंगल रंग' गाण्यातून श्रीराम आणि माता सीतेच्या दिव्य प्रेमाची झलक

■ पुणे (दै. संध्या)

हिंदीमध्ये अरिजित सिंह आणि श्रेया घोषाल, तमिळमध्ये अभय जोधपूरकर आणि सैंधवी, तेलुगूमध्ये राघव कौशिक आणि वैशाली सामंत, कन्नडमध्ये अरमान मलिक आणि बेला शेंडे, तर मल्याळममध्ये नरेश अय्यर आणि अमृता राजन यांनी दिला आवाज; ए. आर. रहमान यांचे संगीत, तर हिंदी गीताचे शब्द डॉ. कुमार विश्वास यांचे

नमित मल्होत्रा यांच्या 'रामायणम्'मधील आणखी एक सुंदर गाणे 'मंगल रंग' निर्मात्यांनी प्रेक्षकांच्या भेटीला आणले आहे. या संगीतमय सादरीकरणातून प्रेक्षकांना केवळ चित्रपटाच्या भव्य विश्वाची झलक पाहायला मिळत नाही, तर भगवान श्रीराम आणि माता सीता यांच्या सुंदर क्षणांचे दर्शनही घडते. या महाकाव्यावर आधारित चित्रपटातील या दुसऱ्या गाण्यात निसर्गरम्य दृश्ये, भव्य राजवाडे आणि या सुंदर जोडीच्या विवाहाची झलक पाहायला मिळते. या दृश्यांमधून त्यांच्या नात्यातील भावनिक खोली आणि प्रेमाची अनुभूती येते.

या गाण्यात रणबीर कपूर भगवान श्रीराम, तर साई पल्लवी माता सीतेच्या भूमिकेत दिसत आहेत. हे गाणे टी-सीरिजच्या अधिकृत यूट्यूब चॅनल 'वर्ल्ड ऑफ रामायणम्'वर उपलब्ध आहे. 'मंगल रंग' हे गाणे हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम अशा पाच भाषांमध्ये



एकाच वेळी प्रदर्शित करण्यात आले आहे. त्यामुळे विविध भाषांतील प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेत या गाण्याचा आनंद घेता येणार आहे.

राम आणि सीता यांच्या प्रवासातील विविध भावस्पर्शी क्षण या गाण्यातून उलगडतात. राजवाड्याची भव्यता, विवाहसोहळ्याचे पावित्र्य आणि अयोध्येपासून दूर वनवासात घालवलेले क्षण यांचा यात समावेश आहे. भगवान श्रीराम यांच्या दृश्यांमध्ये त्यांच्या हातात धनुष्यबाण आणि तलवार दिसते. भव्य दृश्यांनी सजलेल्या या विश्वातून महाकाव्यातील कथा एका सुंदर पद्धतीने साकारण्यात आली आहे. भव्य दृश्यरचनेसोबतच 'मंगल रंग' या गाण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे श्रीराम आणि माता सीता यांच्यातील अतूट नात्याचे भावपूर्ण चित्रण. विवाहाच्या दृश्यांमधून त्यांच्या नात्यातील पावित्र्य आणि आनंदाची अनुभूती मिळते, तर वनवासातील प्रसंग त्यांच्या नात्याचा आणखी एक भावनिक पैलू उलगडतात. राजवाड्यातील